म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११५२८



REFBK-0013112

# गजरा मोतियाचा

वा. शि. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30318 वि: ललित
क्रमांक 2452 नों दि:

# गजरा मोतियाचा

लेखक : वा. शि. आपटे

इनामदार बंधु प्रकाशन

REFBK-0013112

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 93992
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

प्रकाशन ४८ वें

मूल्य दोन रुपये

प्रथमावृत्ति :
२५ डिसेंबर १९६३

© सौ. इंदुमति आपटे

मुखपृष्ठ :
दत्ता महाबळेश्वरकर

प्र का श क :
बा. शा. इनामदार
इनामदार बन्धु प्रकाशन,
९९१ सदाशिव, पुणें २

मु द्र क :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार, पुणें २

सुहृद् वाचकांस –

सौंदर्य आणि सुवास

याचें प्रतीक असलेला हा

" **मोतियाचा गजरा** "

अर्पण

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | फुलांच्या जगांत ... ... | १ |
| २. | पिंगा ... ... | ५ |
| ३. | थांब मरणा, ... ... | ९ |
| ४. | गुलमोहोर ... ... | १४ |
| ५. | कारण यांतहि आनंद आहे ... | १६ |
| ६. | तुमचं ठीक आहे बुवा ! .. ... | २० |
| ७. | गजरा मोतियाचा – ... ... | २४ |
| ८. | आठ अठ्ठावीस व सहा पांच ... | २८ |
| ९. | पाची बोटें ... ... | ३१ |
| १०. | ओझेवाले ... ... | ३५ |
| ११. | आषाढीचें खिन्न चांदणें ... ... | ३८ |
| १२. | वादळ ... ... | ४२ |
| १३. | ते तीन तास ! ... ... | ४६ |
| १४. | गोष्ट आहे एका संध्याकाळची ... | ५१ |
| १५. | आणि जर भाषाच नसती ! ... | ५५ |
| १६. | कात्री ... ... | ५९ |
| १७. | ‘ माणूस ’ हरवला आहे... ... | ६४ |
| १८. | पत्रं नव्हे भावगीतं ... ... | ६८ |
| १९. | शुक्रवार ... ... | ७२ |
| २०. | अंधार ... ... | ७६ |
| २१. | म्हणे वेळ वांचवा ... ... | ८१ |
| २२. | दार उघड – ... ... | ८५ |



● या संग्रहांतील कांहीं निबंध पूर्वी साप्ताहिकें व नियतकालिकांत येऊन गेले आहेत. त्यांनी ते पुनर्मुद्रित करण्यास अनुज्ञा दिल्याबद्दल आभार.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 93992

# फुलांच्या जगांत

कोण आहे ते ? आलों आलों हं—अरे हो, पण थांबा, थांबा हं जरा. मी आंत अडकून पडलों आहें. कडी कांही निघत नाही, दार कांही उघडत नाही. मग बाहेर कसा येऊं ?

त्याचं काय झालं सांगूं का ?

काल संध्याकाळची गोष्ट. रमत गमत या इथं आलों आणि या ठिकाणीं मधु-सेवनांत असा कांही गुंग होऊन गेलों की, भानच राहिलं नाही. स्थळाचं आणि काळाचं देखील. सूर्य केव्हा मावळला कळलंच नाही. या कमळाच्या पाकळ्या अलगद मिटल्या आणि मी आंतच अडकून पडलों. मोठमोठ्या मत्त हत्तींना जेरीला आणणारा मी ! कठिण काष्ठांचा पोखरून क्षणार्धांत भुगा करणारा मी ! या कोवळ्या कमलिनीच्या पाकळ्या उलगडूं शकत नाहीं. रात्रभर पडून आहें. विचार करतों आहें. रात्र संपेल. सुप्रभात

होईल. रात्रभर वियोगांत तळमळणारी चक्रवाकांची जोडी एकमेकांना भेटेल ! पुन्हा सोनेरी सूर्यकिरणं सरोवराच्या हृदयावर नाचतील आणि ज्या नलिनीच्या हृदयांत मी बंदी होऊन पडलों आहें ती हसेल आणि मी पटकन् बाहेर पडेन. हा हन्त हन्त, अजून नाही का पहाट झाली ?

काय ? झाली म्हणतां सकाळ ? कुणाची चाहूल येते आहे ? पारिजातकाची ? हो, एवढ्या पहाटे – उमलण्याची त्याचीच सवय. इथं जवळपास नसेल तो कदाचित्, परंतु त्याच्या फुलांचा सडा जणु माझ्या अगदी जवळ पडल्यासारखा वाटतो आहे. त्याचा आर्द्र सुगंधच सांगतो आहे तें.

हा दूरवरून येणारा मंद गंध केवड्याचा. त्याच्या सुगंधाचा प्रभाव नागराजांवर पडत असेल, परंतु मला भीति वाटते त्याच्या अंगावरच्या काट्यांची. आणि शिवाय मला हवा मध, तो त्याच्याजवळ तर मुळीच नाही !

इथंच कसा मधुर मधुर मकरंद आहे आणि शीतल परागांची शय्या आहे ! अरे, सकाळ झाली वाटतं ! वा ! काय छान ! किती मनोहर ! केवढं सुंदर जग आहे हें ! हीं हिरवीं शेतं आणि त्यांच्या कडेला फुललेलीं तेरडा, तरवड, तीळ, झेंडू यांचीं पिवळीं फुलं ! हिरव्या साडीची ही पिवळी किनार कुणाचं मन वेधून घेणार नाही ?

ज्या सरोवरांतल्या कमळांत मी राहिलों होतों ना तें पाहा किती छान दिसतं आहे. कमळाच्या गोल वर्तुळाकार पानांनीं तें झाकलं आहे. त्या सरोवराकडे पाहिलं की, वाटतं निसर्गसुंदरीच्या कपाळावर कुणी हिरवी टिकलीच गोंदली आहे. आणि त्या तिकडे पहा एका झाडाखाली लाल जास्वंदाचा गेंद वर झुकून पाहतो आहे. लाल तुऱ्यांचा हा कोंबडा पहाटेची बांग तर देत नसेल ? झऱ्यांतून झुळूझुळू पाणी वाहतं आहे. रुणुझुणू आवाज येतो आहे. जलराणीनं पायांत चाळ बांधलेले दिसतात.

आलों. आलों म्हणतों ना ? एवढी कसली घाई ? या फुलांच्या जगांत पदोपदीं सौंदर्य नाचताहे तें पाहत थांबू नको ? वा, वा ! आपल्याला नाही बुवा असली घाई रुचायची. तीं पाहा कारंजीं ! पाण्याचीं नाहीत तीं. फसलांत ना ! प्रकाशाचीं पण नाहीत ! पांढरीं शुभ्र लिलीचीं फुलं आपले तुरे नाचवताहेत——

या इथल्या एका कोपऱ्यांत फुलांचा ताटवा आहे. हिरव्या लगीनसाडी-वर हें कुंकवाचं बोट उठवलं आहे. पलीकडे एका हारीनं गुलाबी डेलियाच्या फुलांची एक सरळ रांग दिसते. वाटतं कुणा विलासिनीनं आपल्या भांगांत गुलाल-शेंदूर भरला आहे. शेताच्या आणि झऱ्याच्या आजूबाजूला रान-शेवंतीचे पिवळे मळे फुलले आहेत. त्यांच्याकडे पाहिलं की, मनांत येतं, श्रावणांतल्या नागपंचमीला कुणी हळदीच्या बोटांनी हीं नागांचीं चित्रंच तर रेखाटलीं नसतील ?

ज्या सरोवरांतून मी आलों तिकडे पुन्हा पाहा. तिथं बगळे बसले आहेत. कसे ध्यान धरून बसले आहेत. अरे, मीच फसलों बरं का. मघाशी तुम्हांला फसवलं आता मीच फसलों. ते बगळे नाहीत बरं का ! पांढरीं कमळं दिसताहेत. माना वर करून पाहताहेत. इकडे एक फुलवेल सूर्यनारायणाला अर्घ्य देण्यासाठी वाकली आहे, तर पलीकडे ती गुलाबवेल पाहा कशी डौलांत उभी आहे. पाहा पाहा तर खरं, तिनं आपल्या मस्तकावर सोनेरी टपोरं फूल कसं अलगद तिरकस खोचून दिलं आहे. चाफ्याचं फूल कानांत कुंडलाप्रमाणं अडकवून पिंगा घालायला निघाली ती चंपकराणी पाहा कशी तोऱ्यांत आहे ! काय ऐट, काय दिमाख ! आणि उलट लाजलाजून एवढीशीं झालेलीं हीं लाजरीं फुलं ह्या इथं पाहा. पण नका, नका, त्यांच्याकडे पुन्हा पुन्हा पाहूं नका. दृष्ट लागेल हो त्यांना, दृष्ट लागेल !

या फुलांशीं त्या फुलांशीं जरा दोन गप्पागोष्टी करूं या का ? विचारूं का त्यांचीं सुखदुःखं त्यांना ? साधींभोळीं, निष्पाप फुलं तीं. काय सांगतील आहे ठाऊक ? एक म्हणेल, “ देवाच्या मस्तकावर विराजमान होऊं दे. ” दुसरं तयार आहे स्वतःला विंधून प्रभूच्या गळ्यांतील हारांत बसायला. कुणाला स्त्रियांच्या वेणींत फुलायचं आहे, कुणाला वीरांच्या पायदळीं !

अहो, याच्याकडे आपलं लक्षच गेलं नाही. म्हणून का हा रुसला आहे ? रागावला आहे ? हा आपला चाफा हो ! हा बोलेना. चालेना. हालेना. हासेना. कसली खंत करतो आहे ? खुलत नाही, फुलत नाही. थांब हं ! आता त्या अवखळ पोरी येतील, मंगळागौरीसाठी दुरडीदुरडी फुलं वेचतील. त्यांचे हार गुंफतील. त्यांचे तुझ्याकडे लक्ष जाईल. त्या मग तुला

चिडवतील. गुदगुल्यादेखील करतील. आणि शेवटीं तुला प्रसन्न करतीलच करतील !

ही गोकर्णी, मधुमालती, कोऱ्हांटी, अगदी साधींभोळीं फुलं. रूप साधं, वास साधा. पण हा साधेपणादेखील एक गुण ठरला आहे. ही अबोली. न बोलतां किती वेगळेपणानं आपली प्रीत सांगते आहे. आणि...

जाऊं द्या. मी फार बोललों का ? मला बोलायला फार आवडतं. आणि बोलायला लागलों की, कशाचं भानच राहत नाही. शिवाय या फुलांच्या सृष्टींत, सुगंधाच्या साम्राज्यांत या विषयावरून त्या विषयावर, नव्हे या फुलावरून त्या फुलावर रमत गमत गप्पा मारत जातांना मजा येते. तुम्हांला नाही यांत मौज वाटत ? सुख होत ?

ही फुलबागेंतील सहल आवडली तर सांगा हं. पाहा हं विसराल. पण तसं कशाला ? आठवण राहावी म्हणून हीं बकुळीचीं फुलं घेऊन जा. तीं सुकलीं तरी त्यांचा सुवास दीर्घकाळ टिकतो. या सहलीची आठवण अशीच राहायला हवी नाही का ?

♣ ♣ ♣

# पिंगा

एकदा गति दिली की, तो फिरूं लागतो. खूप फिरतो. खूप फिरतो. शेवटीं थकतो. आणि मग ? विसावतो. कुशीला पडून राहतो. कुठे जातो तो फिरायला ? कुठेच नाही ! किती लांब जातो ? मुळीच नाही. कुठवर प्रगति करतो ? मुळीच नाही. एक भोवरा आहे हा. स्वतःभोवती फिरत असतो. किती अहंमन्य. किती आत्मकेन्द्रित.

कुंभाराचं चाक तसंच. तेंहि स्वतः-भोवतीच फिरतं. गिरणींतलं तें मोठं थोरलं चक्र. दोन्ही स्वतःभोवतीच जागच्या जागीं राहून फिरतात. कुंभाराचं चाक स्वतः केवळ फिरत राहातं पण स्वतःची हुकमत चालवतं. दुसऱ्यांच्या जीवनाला — मातीला ते आकार देतं. गिरणींतलं चाक स्वतःबरोबर इतर अनेक चाकांना फिरायला लावतं. पण हा भोवरा स्वतःभोवती फिरणार आहे आणि त्याच्या फिरण्याचा इतरांना काडीचाहि उपयोग होणार नाही.

मला कधी कधी वाटतं आपणहि असंच स्वतःभोवती फिरत राहावं. या फिरण्यानं — पिंगा घालण्यानं जी तन्मयता लाभणार आहे ती लुटावी. अशा स्थितींत जावं की, मला रंगाचा विसर पडेल, रूपाचा विसर पडेल, स्थानाचा, अवकाशाचा विसर पडेल आणि एका गुंगविणाऱ्या नादांत मी विरून जाईन. स्वतःला व जगाला नटविणारे रंग आणि आकार झडून जातील !

केशवसुतांनी म्हटली आहे ना, तशी झपूर्झा वृत्ति मला अनुभवायची आहे. ज्ञाताच्या अज्ञाताच्या कुंपणापलीकडे जायचं आहे. मला हरवायचं आहे स्वतःला आणि हरवल्यानंतर पुन्हा शोधायचं आहे ! ती मखमाली लव आणि तीं बोथटलेलीं कंटकशल्यं यांच्याविषयी उगाच गूढगुंजनी बोलायचं नाही. पण मला ती 'झपूर्झा गडे झपूर्झा 'ची मस्ती यायला हवी आहे; ती उन्मनी वृत्ति साधायची आहे.

पुन्हा सांगू का ? या पिंग्यांतील एकतानता मला मनःपूर्वक हवी आहे. असली एकतानता साऱ्या विश्वांत मला आढळली आहे. पृथ्वी स्वतःभोवती फिरते आहे. अनादिकालापासून फिरते आहे. अनंत काळ फिरते आहे. अनंत चंद्र-सूर्य-तारे सारे ग्रह गोल फिरताहेत — पृथ्वी एकसारखी फिरते आहे म्हणून तर उन्हाळा भाजतो आहे. पावसाळा बरसतो आहे. हिवाळा झोंबतो आहे. ऋतुचक्र फिरतं आहे. गति हा सृष्टीचा नियम आहे. गति... लय... !

स्वतःच्या तत्त्वचिंतनांतून आत्मोन्नति आणि मोक्षाचा मार्ग शोधणारे स्वतःभोवतीच फिरत असतात. " तत् त्वम् असि " हेंच शेवटीं ते जगाला सांगतात. " शिवोऽहम् " म्हणून त्यांना जाग येते. शेवटीं " स्वतःला ओळख " असाच ते सर्वांना संदेश देतात. आपणच आपला मित्र, आपणच आपला शत्रु आणि आपणच आपला गुरु हेंच अखेरीस ते सांगतात. हें सारं स्वतःभोवती फिरणं नव्हे काय ?

पुरुष हा असा भोवरा आहे. त्याला गति देणारी प्रकृति ही जशी कांही दोरी आहे. ही एकदा त्याला अशी घट्ट बिलगली. वेड लावलंन् तिनं त्याला. आणि एक दिवस, कशी कुणास ठाऊक, त्याच्यापासून झटकन्

दूर झाली. तेव्हापासून हा फिरतो आहे. वेडा झाला आहे. धुंद झाला आहे. मायेच्या स्पर्शानं ब्रह्म जसं नादांत गुंगलं असेल तसा हा गुंग झाला आहे. सारीपाट खेळत असतांना शिव हरले. पार्वतीनं त्यांचं सर्वस्व जिंकलं. त्या वेळीं उन्मत्तपणे शिवशंकर नाचले असतील तसा हा नाचतो आहे ! स्वतः-भोवती पिंगा घालणारा नर्तक जसा बेभान होतो तसा हा बेभान झाला आहे.

चक्राकार गतीनं पाण्यांत एक जलस्तंभ उभा राहावा, गोल गोल फिरत राहावा तसा हा भासतो आहे. इतक्या गतीनं हा फिरतो आहे की, तो फिरतच नाही असा भास होतो आहे ! आपण आपल्याभोवती फिरूं लागलों म्हणजे अशी एक अवस्था प्राप्त होते की, जेव्हा आपण स्थिर आहों आणि भोवतालचं जग फिरत आहे असं वाटूं लागतं. तसं कांहींसं झालेलं दिसतं आहे या भोवऱ्याचं.

माझ्या मनाचा असा भोवरा व्हावा असं वाटतं मला नेहमी. प्रवास करतांना चक्राकार गतीनं प्रवास करणं आवडतं मला. एखाद्या टेकडीवर चढतांना, माथेरानला जातांना, एखाद्या किल्ल्याचा चढ चढतांना आपण दर वेळीं नव्या उंचीवर येतों, दर वेळीं नवी शोभा दिसते. तोच निसर्ग असतो, परंतु प्रत्येक वेळीं क्षितिज दूर दूर जातं व साऱ्या सृष्टिसौंदर्याला आगळं रूप येतं. उंचीवरून खाली येतांना तें तीन पाकळ्यांचं फूल कसं गोल गोल चकरा घेत भिरभिरत खाली येतं, कबुतरांचा थवा कसा हवेंतील अदृश्य गोल जिन्यावरून हळूहळू चक्राकार खाली उतरतो, तसं खाली यावं आपण, असं मला वाटतं.

मीं विषयान्तर केलं का ? नाही. विषयान्तर करायला मला आवडत नाही. पुन्हा त्या विषयावर उतरायला हवं. हरिदासाची कथा कितीहि फिरली तरी शेवटीं मूळ पदावर यायला हवी. गायकानं सुरेल स्वरांची कितीहि मोठी तान घेतली तरी त्यानं शेवटीं समेवर यायलाच हवं. जेथून आपण निघालों आहों तिथंच आपल्याला पोहोचायचं आहे. मला वाटतं हें तुम्हीदेखील मान्य कराल !

पृथ्वी गोल आहे. आणि संसार एक रहाटगाडगं चक्रनेमिक्रम चालूं आहे. प्रकाश, अंधार, सुखदुःख एकामागून एक येत राहणार आहेत.

तुम्हांलासुद्धा असंच व्हायला हवं आहे. एकच एक प्रकाश, कुठं हवा आहे तुम्हांला ? यांत्रिकपणा, तोच तो पणा, एकसंधपणा नको आहे. गति हवी आहे ! गति हवी आहे.

हा भोवरा. सुरुवातीची त्याची जडता विसरला आहे. आता गिरक्या घेतो आहे. त्याला आता लांबी नाही. रुंदी नाही. त्याला आदि नाही अंत नाही. सतत फिरणाऱ्या वस्तू गोलाकार घेतात. या वर्तुळाची सुरुवात कोठून होते, तें संपतं कुठं हें सांगतां येत नाही ! हा कुठे कसा थांबेल हें सांगणं कठिण आहे. स्थिर पदार्थांच्या सीमारेषा सांगतां येतात, परंतु गतिमय पदार्थांच्या आणि गतिमान जीवनाच्या आदि-अंताच्या रेषा स्पष्ट रेखता येत नाहीत.

या अर्थानं माझं जीवन आदि-अंत न जाणणारं व्हावं असं मला वाटतं. या भ्रमंतींत एक मौज आहे. भव्यता आहे. पृथ्वी-चंद्र-सूर्य इत्यादि सारं विश्व स्वतःभोवती गुंगलं आहे आणि स्वतःभोवती फिरतां फिरतां दुसऱ्या-भोवतीहि रुंजी घालतं आहे !

लहान मुलं आईभोवती, पतंग दिव्याभोवती, पृथ्वी सूर्याभोवती, शक्ति शिवाभोवती, सारीं पिंगा घालताहेत. या फिरण्यांत सौंदर्य आहे ! अमरता आहे ! !

पण माझी एक तक्रार आहे. माझं एक मागणं आहे. मला एकदा कुणी तरी गति द्यायला हवी आहे, गति द्यायला हवी आहे !

♣ ♣ ♣

# थांब मरणा,

थांब मरणा, जरासा थांब. तुझी चाहूल मला ऐकूं आली. काल ! अचानक !

खरं म्हणजे तुझी ओळख जन्माआधीची. तूं माझ्याआधी जन्मलास. मी नंतर. तुझी माझी साथ बरोबर. जिथं मी तिथं तूं आहेसच. कधीकधी मी स्वतःला विसरेन, पण तुला मात्र कधी विसरणार नाही.

तूं मला दिसलास !

अथांग सागराच्या पृष्ठभागावरल्या एका बुडबुड्याच्या अतिपारदर्शक कवचांत तूं मला दिसलास. विशाल अवकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर बाष्पाच्या अतिविरळ शुभ्र रेषेप्रमाणं दिसलास. आणि अंगावर खरकन् शहारे उभारले. कसं वाटलं ?

तुला कोणत्या वेळीं कुणाला भेटायला जावं याचं कांही तारतम्यच नाही. ज्यानं आजन्म अहिंसेची पूजा केली त्याला तूं पिस्तुलाच्या गोळींतून

भेटलास. दहशतवादी क्रांतिकारक जेव्हा फाशीच्या फळीवर तुला भेटायला आले तेव्हा तूं त्यांना टाळलंस. अनेक सत्यशोधकांना जन्मठेपेच्या कैदेंतून तूं मुक्त केलंस. तर वर्षानुवर्षे तुझ्या झाळीं तळमळणाऱ्या दुर्धर रोगग्रस्तांकडे तूं खुशाल दीर्घकाळ पाठ फिरवलीस. प्रचंड धरणीकंपांत हजारोंना तूं गाडलंस, तर कुणा तरी एकाला त्या ढिगाऱ्याखाली जिवंत सोडलंस. जगांत पापकृत्यं करणाऱ्यांना तूं दीर्घकाल जगूं दिलंस, तर तत्त्वज्ञानाचं अमृत जगाला देणाऱ्या सॉक्रेटिसाच्या ओठाला तूं विषाचा पेला लावलास. असा रे कसा लहरी तूं !

पण मरणा, तुला मीं आणखीहि पाहिलं आहे. नाटकाचा शेवटचा अंक संपला म्हणजे पडदा कसा हळूहळू खाली येतो तसा. एखाद्या आषाढी संध्याकाळीं ओला अंधार सावकाश पुढं सरकतो तसा. वाळूच्या घड्याळांतील वाळू नीरवपणे क्षणक्षण जशी गळत राहते वा घड्याळाचे काटे पुढे सरकतात तसा.

कधी कधी तूं येतोस उन्मत्तपणानं. महापुरांतल्या खवळलेल्या लाटा झोपडीझोपडींत शिरून तेथील प्रत्येक वस्तू घेऊन जातात. त्या लाटांसारखा तूं उग्र दिसतोस ! तासांचे टोले झणाणतात तेव्हा ‘ आयुष्याचा नाश ’ मला जाणवतो. झाडांचीं जीर्णशीर्ण पानं सळाळत खाली पडतात तेव्हा तुझी चाहूल येते मला. सागराच्या ओहोटीच्या वेळीं लाटा दूर दूर माघारीं जातात तेव्हा त्यांच्या विरणाऱ्या आवाजांत ऐकलं आहे मीं तुला ! सकाळ वाढत जाऊन तिचं रूपान्तर संध्याकाळमध्ये होतं तेव्हा रातकिड्यांच्या आवाजांत दिवस बुडतांना, जाणवतो मला दिवसाचा मृत्यु !

मरणा, त्या दिवशीं छोट्याशा शस्त्रक्रियेच्या वेळीं तूं मला दिसलास.

पांढराशुभ्र पोषाख केलेल्या परिचारिकांच्या व डॉक्टरांच्या समूहांत सावलीनं तूं वावरत होतास. पुन्हा एकदा तुला पाहिला तेव्हा फूटबोर्डावर उभं राहून लोकलनं प्रवास करणारांच्या पायांत तूं घुटमळत होतास. बेदरकारपणे वाहनं चालवणाऱ्यांच्या मागं धावतोस आणि रस्त्यावर निष्काळजीपणे खेळणाऱ्या बालकांच्या पाठीशी तूं उभा वाटतोस. काममोहित क्रौंच मिथुनापैकी एकाच्या छातींत बाणरूपानं तूं घुसतोस तर बोरांतली अळी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत.
अनुक्रम 3 ५ ३ ८ ७ वि: निबंध
क्रमांक ९५२० नों दि:


होऊन कोणाला दंश करतोस – ! गोकुळांत तूं कृष्णासारखा खेळत वाढत असतोस – पण मला वाटतोस तूं कंसासाठी जन्मलेला मृत्यु म्हणून !

मरणा, ही मेणबत्ती इथं प्रकाश देत आहे, पण याचाच अर्थ आहे ती आपलं मरण जगत आहे. हें फूल इथं उमललेलं आहे. त्याची आंतली पाकळी जराशी अर्धी विकसत आहे तेवढ्यांत त्याची बाहेरची पाकळी सुकत आहे ! एकाच वेळीं आंत जीवन निथळत आहे, बाहेर मरण चुरगळत आहे. कधीकधी खूप दूरवरून तूं येतोस तेव्हाहि मी तुझ्या तुतारीच्या गंभीर ललकाऱ्या ऐकतों. तुझ्या पडघमांचा दबलेला आवाज ऐकूं येतो मला, पण त्याच्यावर एखाद्या कृष्णवस्त्राचं आच्छादन असावं म्हणून त्या पडघमाचा आवाज दबलेला आहे ! छातींत त्याची धडधड ऐकूं येते.

पण एक सांगूं का ? ही धडधड सर्वांनाच ऐकूं येत नाही. मूर्ख व अहंमन्य लोकांना नाही ही साद येत. ते आपले कधी भाबडेपणानं, कधी खोट्या शूरत्वानं म्हणत असतात, " याला मी मारीन. त्यांना मीं मारलं आहे, हनिष्ये चापरानपि ! " वेडे खुळे कुठले ! बेट्यांनो, बुद्धिबळांतलीं प्यादीं–मोहरीं तुम्ही. लाकडाचीं खेळणीं. तुम्ही का सरकतां ? तुम्ही का शह देतां ? मारतां ? तुम्ही का जिंकतां ? छे हो, तुम्हांला हलवणारा तो ' वर 'चा हात तुम्हांला खेळवतो आहे. तो हात एक दिवस सगळाच खेळ उधळून देईल. त्या सर्वसंहारक शिवाचं तांडव सुरू झालं की, नक्षत्रतारागण-देखील खाली खेचलं जाईल ! तिथं तुमचा काय पाड ? लोकक्षयकृत प्रवृद्ध असा तो ' काळ ' साक्षात् पुढं उभा राहिला म्हणजे त्याच्या कराल दंष्ट्रांतून कोण सुटेल ?

पण बेट्या मरणा, तुला मारून आणि तुला जिंकून कांही मानव अमर झाले आहेत. समशेरीच्या शूर शिकंदरांचं चरित्र तुझ्या पाषाणावर चिरंजीव झालं आहे. शब्दसृष्टीच्या सम्राटांचं वाङ्मय अक्षर, व विदग्ध म्हणून मिरवत आहे. तपोनिधि व तत्त्ववेत्ते, ज्ञानी आणि नेते, कल्पक आणि कलावंत यांनी तुझ्यावर मात केली आहे. सतीच्या निष्ठेपुढं सूर्य उगवायचा थांबला व तुला माघार घ्यावी लागली. संताच्या शब्दासाठी चितेवर ठेवलेलीं प्रेतं तुला जिवंत करून उठवावीं लागलीं. सावित्रीच्या द्युतीला

धृतीला, मतीला, स्तुतीला तूं भुललास—अरे मरणा, तुझा पराभव करणारे तुला भेटलेच नाहीत असं नाही !

मी छोटा आहें. मी कुठला तुझा पराभव करणारा ? मी तुला विनवणार ‘ थोडा थांब ’ एवढंच ! पण तरीहि मला ठाऊक आहेच की, मी रडलों, तुझी करुणा भाकली, विनवण्या केल्या, तरी तूं मला थोडीच दया दाखवणार आहेस ?

पण मला तरी तुला सोडून कुठं जायचं आहे ? पण म्हणायचं आहे, ‘ थांब जरा,—’

मला या जीवनाची पुरेशी ओळख नाही. ती करून घ्यायची आहे. तसं म्हटलं तर या जीवनाची मला फारशी आसक्ति नाही. कांही अलौकिक कार्य करून भव्य दिव्य कीर्ति मला नको आहे. या जगांतलीं वैभवं, कीर्ति, संपत्ति, सौंदर्य सारीं क्षणजीवी आहेत हें ठाऊक का नाही मला ? या जगांत कीर्ति कीर्ति जिला म्हणतात ती मृतांचं अन्न आहे हें मी जाणतों. जे तथाकथित अमर आहेत, चिरंजीव आहेत त्यांचीं नांवं हीं अनंत सागराच्या पृष्ठभागावर लिहिलीं जाणार आहेत. तीं दहा, शंभर—हजार—लाख वर्षं टिकतील; परंतु मरण अनादि आहे, अनंत आहे, अमर आहे. जीवन बहुरूपी, बहुढंगी असलं तरी सारे रंगढंग शेवटीं कृष्णमय होऊन जातात याची जाणीव का मला नाही ?

आणि मला कुठं तुला टाळायचं आहे ? तुझ्या स्वागतासाठी केव्हा तरी मला सिद्ध व्हावंच लागणार आहे. पण सांगायचं आहे एवढंच की, आजच येऊं नकोस. उद्या ये, परवा ये. छान छान रूप घेऊन ये !

मला तुझ्याबद्दल प्रेम वाटावं, तुझ्याबद्दल भीति वाटावी. तुझ्याजवळ एकच मागणं आहे, अगदी एकच, खरंच एक.

जेव्हा मी मोहाच्या आधीन होणार असेन तेव्हा मला इषारा दे. जेव्हा मी पापाच्या विहिरीच्या काठावर उभा असेन तेव्हा तूं मला मागं खेच. माझं जीवन, माझं मरण अपमानित होऊं देऊं नकोस. लांच्छित करूं नकोस. माझं मरण असावं मनीषीचं ! मर्दाचं ! मरणांतहि मौज असावी.

मी रथाचं चाक वर काढीत असतांना येऊं नकोस ! धनी गडावर पोहोचल्याची तोफेची खूण कानावर पडण्यापूर्वी येऊं नकोस. ज्या ध्येया-

साठी आमरण धडपड केली तें ध्येय अगदी हाताशीं आलं असेल तेव्हा तूं आडवा येऊं नकोस.

एखादी आई आपल्या निद्रित बाळाला जशी पदराखाली घेते तसा तूं मला घे, सागरमीलनासाठी एखादा जलप्रवास जसा वेगानं, गंभीर निश्चयानं मार्गक्रमणा करतो तसा मी तुला भेटायला येईन. आत्मार्पणाच्या धुंदीनं ज्वालेवर झडप घालणाऱ्या पतंगासारखा नाही झेपावणार नाही, नववधूसारखा लाजत, मागं सरत पुन्हा पुढं सरकत नाही येणार मी तुझ्याकडे. मी येईन एखाद्या स्वयंवराचा पण जिंकलेल्या राजकुमारासारखा !

तूं मला जवळ घे. एखादं पूर्ण उमललेलं फूल देवाच्यापायीं वाहण्यासाठी आपण खुडतों, तसा मला तूं उचल. तुझ्या नखाच्या स्पर्शाचहि दुःख होऊं देऊं नकोस. मात्र या जीवनपुष्पाचा पूर्ण विकास होऊं दे. देवाला मुक्या कळ्या आवडत नाहीत. आणि म्हणून मी विनवतों तुला जरा थांब ! थांब थोडा.

♣ ♣ ♣

# गुलमोहोर

माझ्या खिडकीसमोर खूप मोकळं आणि हिरवं गार असं एक मैदान दिसतं आहे. त्या मैदानाच्या कडेला एक गुलमोहोर उभा आहे. आज सकाळीं मी उठलों आणि माझी पहिली नजर त्याच्याकडे गेली. कसा लालबुंद दिसत होता. अगदी फुलीं फुलून आला होता.

एखाद्या अग्निज्वालेसारखा प्रदीप्त आणि उबदार वाटतो आहे तो !

एखादं चित्र रंगवण्यापूर्वी आपल्या रंगफलकावर, कोपऱ्यांत चित्रकार जरा नमुन्यासाठी जसा घट्ट रंग ओतून घेतो तसं विधात्यानं हें विशाल मैदान चित्रविचित्र फुलांच्या चित्रांनी रंगवण्यापूर्वी एका टोकाला हा लाल रंग ओतला असावा.

असं तर झालं नसेल—की, वसुंधरेच्या उंबरठ्यावर हें कुंकवाचं बोट सुप्रभातीं कुणी टेकवलं असेल !

किंवा सृष्टिसतीच्या हिरव्या शालूच्या कोपऱ्याला ही लाल रंगाची कोयरी कुणी कशिद्याने काढली असेल.

अंऽहं – काल रात्रीं आकाशाच्या खिडकींतून कुणा देवांगनेनं मदिरेची चूळ खाली टाकली असेल आणि ती नेमकी याच वृक्षावर पडली असेल !

छे हो ! या वनस्थळींत वनदेवता सोंगट्यांचा डाव खेळायला जमल्या असतील. खेळतां खेळतां पहाट झाली असेल. घाईघाईनं जातांना सगळ्या सोंगट्या त्यांनी उचलून नेल्या आणि हीच एकटी एक लाल सोंगटी राहून गेली !

अथवा कुणी फुलराणी आकाशांतल्या ताऱ्यांशीं खेळायला गेली तेव्हा तिनं एक पाऊल या झाडावर टेकलं आणि दवानं भिजलेल्या या वृक्षाच्या पानापानाला फुलराणीनं तळपायाला लावलेल्या आळित्याचा रंग लागला ! !

अरुणराजाच्या स्वागतसमारंभांत त्याच्या मिरवणुकीच्या मार्गावर गुलाल फेकण्यासाठी तर कुणी हें गुलालाचं तबक भरून ठेवलं नसेल ?

किंवा त्याला फुलांच्या पायघड्या घालण्यासाठी तर कुणी इथं फुलं गोळा करून ठेवलीं नसतील ?

एकदा वाटलं काल रात्रीं तारका जेव्हा जलविहार करण्यासाठी पलिकडल्या पुष्करणींत उतरल्या तेव्हा या लाल डगलेवाल्याला त्यांनी इथं उभा करून ठेवला – आणि तो खुळा अजून तसाच उभा आहे !

उषादेवीच्या मंगल-विवाहसमयी वापरायचा म्हणून हा लाल शेल्याचा अंतरपाट इथं घडी उलगडून कुणी ठेवला असावा.

का काल रात्रीं चंदाराणीची वरात पुढं निघून गेली आणि त्या वरातींत मिरवलेली ही अबदागीर इथंच विसरली ?

वृंदावनांत पाहिलेल्या लाल रंगी कारंजाचा भास झाला मला. प्रिय सखीच्या सहवासांत घालवलेल्या अनेक गुलाबी आठवणी समूर्त झाल्या. असंख्य उबदार क्षणांची मनांत उजळणी झाली.

हा गुलमोहोर पुनः पुन्हा बहरतो – माझ्या त्या अननुभूत सुखद क्षणांची पुनः पुन्हा आवृत्ति व्हावी म्हणून मी या तरुतळीं वाट पाहणार आहें !

♣ ♣ ♣

# कारण यांतहि आनंद आहे

संध्याकाळच्या वेळीं मी घरीं येतों. कां ? बहुधा दुसरीकडे कुठं जायला जागा नाही म्हणून. मग वाटतं, घर... हें किती रम्य ठिकाण आहे.

दारांत विभावरी उभी असते. तिच्या डोळ्यांत प्रतीक्षा असते आणि ओठांत मीं रचलेलं भावगीत असतं, आणि हृदयांत असते आतुरता. आणि माझ्यावरची गाढ प्रीति. दोन शेपटे घातलेले असतात तिनं. त्यांतला एक पुढं घेतलेला असतो. माझं स्वागत करतांना हातानं त्याच्याशीं चाळा चाललेला असतो तिचा. तिचा तो हात हातीं घेत मी आंत येतों.

कधी कधी मी वेळेवर घरीं येतच नाही. विभावरीला न सांगतां परस्पर चौपाटीवर जातों. बरोबर नयना दिघे असते. कधी कधी नयना चित्रपटाला जाऊं या असा आग्रह धरते. माना वेळावीत, लाडिक शब्दांनी केलेला आग्रह

मला मोडवत नाही. चित्रपटांतल्या मध्यंतरांत 'सोडा फौंटन' वर कोकोकोला घेतों. माझे मित्र मत्सरभरल्या दृष्टीनं पाहत असतात. मला फार बरं वाटतं.

माझ्या ऑफिसमधले 'मित्र अंजळ्याची सहल ठरवतात. शनिवार-रविवारला जोडून सुटी आली आहे. हा योग काय नेहमी येतो. सारे जाणार आहेत. ती चंद्रप्रभा नाडकर्णी जायची आहे, विजयमाला रेगे जायची आहे. त्या दोघी माझ्याकडे पाहत नाहीत, बोलत नाहीत, पण एक दिवस मी त्यांचा असा नक्षा उतरवणार आहें!

तसा तो हेडक्लार्क रंगनाथन् पक्का बुद्दू आहे, पण माझ्यावर लेकाचा एकसारखं 'बॉसिंग' करीत असतो. पण जेव्हा का ऑफिस–सुपरिंटेंडेंट डी. रामाचार्य त्याला फैलावर घेतात आणि त्याची चांगली खरडपट्टी काढतात तेव्हा मला माझ्या मनाच्या एका कोपऱ्यांत फार बरं वाटतं.

मी घरीं परत येतों तेव्हा ऑफिसमधलं कांही बोलायचं नाही असं मीं अगदी ठामपणें ठरवून टाकलेलं असतं, पण विभावरीपुढं कांही लपवतां येत नाही. मनांत शिरून सारं कांही काढून घेते! लबाड आहे मोठी—!

रात्री दोन-अडीचला उठतों. आणि लेखणी सरसावून मी लिहायला बसतों. एक मस्त नाटक लिहायला घेतलं आहे. मुंबई मराठी साहित्य संघाचे कार्यवाह माझ्या चांगले ओळखीचे आहेत. पहिला अंक मी त्यांना वाचून दाखवला. "फारच छान झाला आहे!" असं ते म्हणाले. माझं नाटक पुरं झालं की, त्याचे प्रयोग पुण्या-मुंबईत होणार आहेत. विभावरीची एक मैत्रीण आहे. श्यामा नांव तिचं. ती म्हणते फार चांगलं झालं आहे नाटक. नाट्यस्पर्धेत त्याला नक्की पहिलं पारितोषिक मिळणार. दिल्लीला पं. नेहरूंसमोर त्याचा प्रयोग करायचंदेखील योजलं आहे. त्याचा जर राष्ट्रपतींकडून गौरव झाला तर चंद्रप्रभा नाडकर्णीचा व विजयमाला रेगेचा असा कांही नक्षा उतरेल——

होना, यंदा महिनाभर रजा घेऊन काश्मीरला जायचा बेत करतों आहें. रेल्वेचीं वेळापत्रकं, प्रवासवर्णनं, यात्राकंपन्यांचीं माहितीपत्रकं यांचा हा ढीग पडला आहे सध्या माझ्या टेबलावर.

माझ्या खोलींतली सतरंजी फाटली आहे. काश्मीरहून एखादा बऱ्यापैकी गालीचा आणावा म्हणतों! येतांना ग्वाल्हेरहून टी-सेट आणला पाहिजे.

सध्या या कानतुटक्या कपांतून चहा प्यावा लागतो आहे. विभावरी बोहारणीकडून चांगल्याशा कपबशा घेणार आहे. माझे बरेच कपडे आहेत— तिचींहि पातळं आहेत. तीन पातळं आणि दोन वुलनच्या पॅन्टस् देऊं केल्यावर परवा बोहारणीनं एक स्टेनलेसचं बोंडलं देऊं केलं तेव्हा तो सौदा फिसकटला. पण एखाद दिवशीं जमेल पुन्हा आणि नवीन कपबशी येईल घरांत. पण मला वाटतं आपण त्रागा करावा आणि हा कानतुटका कप फेकून द्यावा सरळ. त्याशिवाय कांही नवीन कप यायचा नाही घरांत.

एखाद दिवशी मी आजारी नसतों, पण ‘ सिकांत ’ पडतों व तशी चिठी पाठवून देतों मी कचेरींत. मग दुपारीं विभावरीबरोबर आइस्क्रीम खातों आणि संध्याकाळच्या पिक्चरला निघतों. वाटेंत कुणी भेटूं नये अशी इच्छा आहे, परंतु धोपेश्वरकर नेमका भेटतो. मी त्याला द्यायचं उत्तर पाठ केलेलं आहे : “ मी डॉक्टरांकडेच निघालों आहें – ”

येतांना पाऊस पडतो आहे. माझा रेनकोट आहे. विभाची लेडीज छत्री आहे, पण आम्ही ती नेलेली नाही, मग आम्ही भिजतों. खूप भिजतों. खूप मजा वाटते. विभावरीचं नायलॉनचं पातळ तिच्या अंगाला चिकटून बसतं. तिचं आंतलं ब्रेसिअरदेखील तंगपणें दिसूं लागतं. विभावरी सुंदर दिसते. ओलेत्या स्त्रिया नाही तरी दिसतातच सुंदर.

मला खूप गंमत वाटते. मी सर्व जगांत सुखी आहें. मोठमोठ्या मंत्र्यांपेक्षा, पुढाऱ्यांपेक्षा सुखी आहें. लाखलाखांच्या सभेंत ते गर्जून भाषणं करीत असतात आणि शिणत असतात. त्याच सभेंत मीहि असतों. सभेच्या एका टोकाला खारे दाणे खात बसतों. गर्दी उठली की मी त्यांत मिसळून जातों. गर्दींत असतों आणि नसतोंहि.

कधी कधी मला गर्दी आवडत नाही. कुठं तरी मैफल असते. स्वर्गीय संगीताचा जलसा असतो. मी जातों तिथं. पण मला वाटतं इथं गर्दी नसावी. गायन ही एक श्रेष्ठ कला आहे. विदग्ध रसिकांसाठी आहे. सामान्यांसाठी नाहीच ! विशुद्ध शास्त्रीय संगीत का सामान्यांसाठी आहे ? कशाला इथं लोकांनी गर्दी करावी ?

मला असंच कांही तरी अत्यंत श्रेष्ठ, विदग्ध वाङ्मय लिहायचं आहे. मला गर्दीसाठी कांहीच लिहायचं नाही. म्हणूनच तर माझं नाटक अजून पुरं झालेलं नाही.

मी अद्याप कांही तरी लिहितों आहें. तें गर्दीला आवडणारं नाही. तें अजून कुणालाच आवडत नाही. चंद्रप्रभा आणि विजयमाला यांना त्याचं कौतुक नाही. श्यामाला खरं म्हणजे कांही कळत नाही. अन् विभावरी ?— तिच्याबद्दल काय सांगावं ? कुठल्या गृहिणीला आपल्या पतीच्या साहित्य-सेवेची महती कधी पटली आहे ?

तिचं म्हणणं, "उगाच दिवे जाळतां, शाई-कागद खर्च करतां झालं !"

पण तिचं तसलं मत मी कधीच मनावर घेत नाही. ती माझी प्रतीक्षा करते रोज संध्याकाळीं. चार चौघींसारखी वागते आहे अन् करते आहे ना माझा संसार. बस्स् !

मी मित्रांच्याबरोबर अजंठ्याच्या ट्रिपला जायचं ठरवतों आणि आयत्या क्षणीं निरोप पाठवतों, "मी येऊं शकत नाहीं !" मला भीति वाटते चंद्रप्रभा आणि विजयमाला यांच्यावर मला इम्प्रेशन टाकतां येणार नाही. मी एकटाच जाईन. कधी तरी. किंवा जाणारहि नाही. तीं अजंठ्यांतील स्त्रियांचीं चित्रं का माझ्या विभावरीपेक्षा सुंदर आहेत ?

म्हणून मी कुठंच जात नाही. दुपारीं सिनेमाला जात नाही. संध्याकाळीं पावसांत भिजायला जात नाही. सभेला जात नाहीं. इथंच बसतों.

या खोलींत मी एकटा आहें. ही सतरंजी फाटली आहे. हा कप कान-तुटका आहे. मला नोकरी नाही. अगदी बेकार आहें मी. मुंबई मराठी साहित्य संघांत माझ्या ओळखीचं कुणी नाही. कुणीहि श्यामा, विजयमाला, आणि चंद्रप्रभा मला ठाऊक नाहीत. अहो, माझं लग्नदेखील झालं नाही अजून ! कुठली विभावरी घेऊन बसलांत ?

मी लिहीत असतों एवढं मात्र खरं. स्वतःसाठी. केवळ स्वतःसाठी. कारण यांतहि आनंद आहे !

♣ ♣ ♣

# तुमचं ठीक आहे बुवा !

दिनूअण्णा तावातावानं विष्णुपंतांना सांगत होते, "काय हो झालं तुम्ही गणेशोत्सवासाठी पांच रुपये वर्गणी दिली तर ? दोन्ही मुली मिळवताहेत. तुम्हांलाहि पगार कांही थोडाथोडका नाही. बरं ज्या चाळींत तुम्ही राहतां तिथं भाडं अजून जुनं म्हणजे किती तरी थोडं आहे. अजून मालकांना दहाच टिकल्या देतां ना ? तुम्ही दोघं नवरा-बायको आणि दोघी मुली. आटोपशीर काम. मुलींचीं लग्नं होऊन त्या सासरीं जातील आणि मग तुम्हांला नुसत्या फंडाच्या व्याजावर आरामांत राहतां येईल ! काय ? मी म्हणतों तें खरं की नाही ? "

दिनूअण्णांनी माझ्याकडे वळून प्रश्न केला. दिनूअण्णांची बाजू एका अर्थानं मला पटली होती; परंतु विष्णुपंतांची बाजूहि मला पूर्ण ठाऊक होती. म्हणूनच दिनूअण्णांच्या प्रश्नाला बगल देण्याच्या हेतूनं म्हटलं, " त्याचं

असं आहे अण्णा, गणपतिउत्सवाची वर्गणी देणं या प्रश्नांत कांही तात्त्विक प्रश्न पण आहेत. विष्णुपंतांनाच काय, मलाहि वाटतं या उत्सवांत बौद्धिक कार्यक्रम होतच नाहीत आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नांवाखाली जे गैर आणि अभिरुचीला सोडून कार्यक्रम होतात त्यांसाठी आपली वर्गणी जावी हें अगदी वाईट आहे ! शिवाय आम्हांला चाळीत एकदा, लेनमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव आहे त्याला एकदा, आणि गावचा एखादा, अशा अनेक ठिकाणीं वर्गणी द्यावी लागते."

" आलेत मोठे कड घ्यायला !" अण्णा फिसकारले.

" कड घेण्याचा प्रश्न आलाच कुठं ?" मी प्रतिप्रश्न केला.

" तुम्ही किती वर्गणी दिलीत ?" पुन्हा मीं अण्णांना डिवचलं.

" माझी गोष्ट निराळी. मी दोन रुपये दिले. पण त्याचं असं आहे —"

दिनूअण्णा सांगू लागले एवढ्यांत " दिनूअण्णा, अहो ऽ दिनूअण्णा ऽऽ" अशा हाका ऐकू आल्या. दिनूअण्णांकडे कुणी तरी आल्याचं दिसलं तेव्हा दिनूअण्णा आपल्या बिऱ्हाडांत घाईघाईनं निघून गेले.

दिनूअण्णांना जसं विष्णुपंतांचं सारं ठीक दिसलं तसं मला दिसत नव्हतं. दोन्ही मुलींना नोकऱ्या होत्या. परंतु एकीनं आपलं लग्न परजातींतल्या तरुणाशीं जुळवलं होतं आणि ती घरांत एक नवा पैसा पण देत नव्हती. दुसरीला पगार फार थोडा होता आणि जो होता तो साड्या, पावडर वगैरे प्रसाधनं, रेल्वेपास, हॉटेल, सिनेमा, भेटी देणं यांत संपून जायचा व तीच विष्णुपंतांकडं मधूनमधून पैसे मागायची. विष्णुपंतांना पगार काही फार मोठा नव्हता. मागल्या मोठ्या आजारपणांत त्यांनी फंडांतून जें कर्ज काढलं होतं तें अद्याप फिटलं नव्हतं. भाडं जुनं होतं, परंतु घराला रंग देणं व डागडुजीचा खर्च विष्णुपंतांना करावा लागे. मालक करीत नसे. विष्णुपंतांचा एक भाऊ क्षयानं आजारी होता आणि त्याच्या संसाराला दरमहा कांही ना कांही मदत विष्णुपंतांनाच पाठवावी लागायची !

पण हें सारं दिनूअण्णांना पाहायचं काय कारण ? दिनूअण्णांना विष्णुपंतांचं सारं कांही ठीक दिसत होतं. पण दिनूअण्णांना कशाला दोष द्यायचा ? दिनूअण्णांसारखीं माणसं पुष्कळ आहेत.

आमच्या शाळेत एक श्रीयुत व त्याच्या सौभाग्यवती दोघंहि काम करतात. शाळेंतील सर्व लोक त्यांना म्हणतात. "तुमचं ठीक आहे बुवा. दोघं मिळवतां. एकाच्या पगारांत भागून एकाचा पगार सरळ एक तारखेला बँकेंत पडत असेल !"

'तुमचं ठीक आहे बुवा' या म्हणण्यात एक प्रकारची सुप्त असूया आहे की नाही हें नाही सांगता येणार, पण त्यांत छोटीशी, स्वतःबद्दलची कुरकूर आहे. हें मात्र खास. त्यांत एक असमाधान आहे. आणि तेंहि उगाच, अकारण. स्वतःचं ठीक असलं तरी तें इतरांना भासूं द्यायचं नाही असा चमत्कारिक आग्रह आहे त्यांत. जणु कांही आपलं सारं ठीक आहे असं म्हटलं तर कुणी तरी आपल्याकडे ताबडतोब कांही मागायला येणार आहे. कांही संकट घालायला येणार आहे कुणी !

परंतु दुसऱ्याच्या सुखदुःखाबद्दल आपल्याला काय वाटतं हें जरी सोडून दिलं, तरी आपण आपलीं सुखं मनमोकळेपणानं कबूल करायला कुठ तयार असतों ? दुःखाचा स्वीकारहि आलेल्यांचा स्वीकार करा या वृत्तीनं कुठं करतों ? दुसरं बक्षिस मिळालं तर पहिलं हवं असतं. मुलगी मनासारखी मिळाली तरी हुंड्यांत शे-दोनशे कमी पडल्याबद्दल कुरकुरतो. तसंच दुःखाचं. दाढ दुखायला लागली वाटतं, अरेरे, दाढ उगाच दुखते आहे. कांही सुचत नाही. त्यापेक्षा डोळ्यांची आग झालेली चालली असती. ताप परवडेल, पण खोकला नको. गुडघे—पाय दुखले तर बसून राहतां येईल, परंतु कानांतला ठणका नको.

सुखदुःखाची निवड आणि प्रमाण ठरवण्याचं स्वातंत्र्य देवाला, आपल्याला दिलं नाहीं म्हणून बरं आहे. तें जर माणसाला देतां, तर त्या अनंतहस्त कमलावरालाहि माणसाच्या मागण्यांप्रमाणं पुरवठा करतां आला नसतां !

'तुमचं ठीक आहे बुवा !' म्हणणारीं माणसं माझ्या मतानं जोडा काय तो आपल्याच पायांत आहे व तो आपल्याला चावतो आहे असं मानणारीं असतात. सुखदुःखाचा तौलनिक विचार करतां करतां तीं बेजार होऊन

सुखानं आणि दुःखानंहि तीं आजारी पडलेलीं आहेत असं मला वाटतं. का नाही मानूं आपलं सारं ठीक आहे म्हणून ?

दिनूअण्णांना मात्र वाटतं, 'आपलं दुःख दुसऱ्याला दिसत नाही !' दिनूअण्णांना 'दुसऱ्याचं कसं सारं ठीक आहे' हें मात्र स्पष्ट दिसतं.

दिनूअण्णा त्यांच्या या वृत्तींतून मला म्हणतात, "तुमचं ठीक आहे बुवा !"

आणि मीहि त्यांना ठणकावून सांगतों, "हो बुवा. आपलं अगदीं ठीक आहे. मस्त, मजेंत आहे सारं कांही !"

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नों दि ....................

# गजरा मोतियाचा—

कुंटे चौकांत एक दहा-अकरा वर्षांची छोटीशी मुलगी हातांत चार-सहा गजरे घेऊन विकायला उभी होती. मध्येच हलक्या आवाजांत म्हणत होती, 'गजरा घ्या गजरा– गजरा– गजरा मोतियाचा–'

मीं चमकून तिच्याकडे पाहिलं. लहानशी मुलगी. जिचं वय डोक्यांत गजरे घालण्याचं होतं, फुलं वेचून माळा करून, त्या गळ्यांत घालून समवयस्क मुलींबरोबर नाचायचं होतं, ती सुकुमार मुलगी मोतियाचा गजरा विकत होती—

तो गजराहि होता छान! माझ्या घरापुढच्या छोट्या बागेंत मोगरा आहे. या दिवसांत त्याला बहरहि आलेला आहे. माझी छोटी बहीण पुष्पा धावते त्याचीं फुलं तोडायला. हार-गजरे करायचा तिलाहि सोस आहे.

एका काळीं मलाहि हार–फुलांचे भरघोस हार फार आवडायचे. त्या वेळीं मी शाळेंत जाणारा विद्यार्थी होतों. आणि शनिवारपेठेंत बिऱ्हाडाच्या अपुऱ्या जागेंत आम्ही राहत असूं. तेव्हा बाग नव्हती त्या घराला.

—आणि मला तर फुलांच्या हारांची फार हौस! बुधवार चौकांत आणि बाहुलीच्या हौदाजवळ फुलांच्या दुकानांत मोगरीच्या कळ्यांच्या, चमेलीच्या, मदनबाणांच्या भरदार माळा एका हारीनं लावलेल्या असायच्या! गुलछडीच्या फुलांशीं मधमाश्यांचं गुंजन चालायचं. तो फुलांचा दमट वास अजून माझ्या नाकांत आहे! ऋतूऋतूंत त्या हारांचे रंग बदलतात.

आठवतं मला आश्विन-कार्तिकांत शेवंतीच्या पिवळ्याधमक छोट्या-मोठ्या फुलांचे कमानखानी हार असे झगझगत की, डोळे दिपून जात. नवरात्रांत तशीं तीं डेलियाचीं दळदार फुलं गुच्छागुच्छांनी पितळी कुंडी-बाहेर डोकावत. लांब देठांचीं विलायती गुलाबांचीं फुलं एका बाजूला असायचीं तर दुसऱ्या बाजूला झेंडू-तिळाच्या फुलांचा हा ढीग ओतलेला असायचा. रामनवमीच्या वेळीं– दवणा! त्याचा उग्रसर वास–तर भाद्रपदांत केवड्याचा सुगंध!! मन धुंद होई. मधून मधून कडवट पानांचा दर्प येई. वर्खांच्या रंगीबेरंगी कडकडीत, चकचकीत कागदी पट्ट्या बेरंग करीत तरीहि मन लोभावें.

फुलांच्या दर्शन व सुगंधसुखासाठी रोज एकदा तरी संध्याकाळच्या वेळीं मी या भागांतून फेरी मारीत असें. त्या काळांत आमच्या पुण्यांत बागा नव्हत्या, पार्क नव्हते!

फुलांशीं–हारांशीं त्या काळांत कुठला यायला आपला संबंध? तसं म्हणायला रोज देवासाठी एक पैशाचा फुलाचा पुडा आणायचों आम्ही. आणि कधी गुरुवारीं किंवा शनिवारीं हार. तो फुलांचा पुडा म्हणजे चार फुलं बिन-वासाचीं, कण्हेरी, तेरडा यांचीं. तींहि पाणी मारून मारून टिकवलेलीं! वाण्याच्या दुकानांत पूजेच्या सुपाऱ्या म्हणून वेगळ्या मिळतात—अगदी बारीक, टाकाऊ, खाण्यास अयोग्य अशा. देवाला पण अशीच निर्गंध फुलं मिळतात पुड्यांत व हार म्हणून सहा फुलं असलेला हातभर दोरा!

इतिहासाच्या पुस्तकांतून शहाजहान, नूरजहान, माधवराव वगैरे प्रसिद्ध व्यक्ति हातांत फूल घेऊन दिसायची ! परंतु रस्त्यानं कुणी हातांत, कानांत फूल घेऊन वा कोटावर फूल अडकवून जाईल तर त्याची छचोरांत गणना व्हायची. गुलहौशी हा शब्द तर शिवीच होता. हाराचा संबंध आयुष्यांत दोन वेळां यायचा. एकदां बोहल्यावर—आणि शेवटीं तिरडीवर !

मी मोठा झालों तेव्हा माझ्या फुलवेडेपणानं वाङ्मयीन रूप घेतलं. भामेच्या आणि रुक्मिणीच्या प्रेमाची कसोटी पाहणारा पारिजातक मला आवडूं लागला ! सन्मित्रांचं स्वागत करणारीं जाईचीं फुलं मोहक वाटलीं. झाडाखाली, तळ्याकाठीं आकाशगंगेच्या पऱ्यांप्रमाणं अनंत पसरलेलीं डॅफोडिल्स एकान्तांत, विमनस्क स्थितींत मनश्चक्षूंसमोर नाचूं लागलीं. स्वतःच्या रूपावर प्रेम करणारं तें वेडं नार्सिसचं फूल, आणि त्यांना प्रिय असलेलीं निळादंतीचीं फुलं, सारीं मला मोहवीत होतीं.

परंतु फुलांवरचं वाङ्मयीन प्रेमहि मग थंडावलं. एकदां वाटलं होतं, राजधानींतल्या रस्त्यावरून जात असावं, आणि एखादा शृंगारलेला हत्ती सोंडेंत वरमाला घेत डुलत डुलत यावा, त्या राज्यांतल्या राजकन्येचं स्वयंवर असावं आणि त्या गजराजानं आपल्या गळ्यांत ती पुष्पमाला घालावी ! एकदा वाटलं होतं, एखाद्या सकाळीं उठतांच कीर्तिदेवता प्रसन्न झालेली आढळावी, तिनं गौरवाच्या माळा गळा पडाव्यात ! परंतु आयुष्यांत हार मिळवण्यापेक्षा हार खाण्याचेच प्रसंग अधिक आले !

आता मला हारांचं कौतुक राहिलेलं नाही. मी फार श्रीमंत नाही आणि गुलहौशीपणा पण उरलेला नाही. तरीहि मी त्या कोपऱ्यावरच्या अल्पवयी, गरीब फुलविक्यांकडून गजरा मोतियाचा विकत घेतों !

माझ्या घरीं ईश्वरकृपेनं फुलबाग लाभली आहे मला. घरांतलं पावित्र्य आणि संस्कृति यांची आठवण करून घेणारी माझ्या आईसारखी तुळस आहे. माझ्या वडिलांसारखा समाधानी, आणि नेमानं बहरणारा पारिजातक आहे. माझ्या दरिद्री संसारांत नेहमी आनंदी असणारी माझ्या पत्नीसारखी सदाफुली आहे. मी रागावलों, चिडलों, अवहेलना केली तरी पुन्हा पुन्हा माझं वागणं मनावर न घेतां माझ्यावर स्नेहाचा वर्षाव करणारी माझी

बहीण जाईजुईसारखी वाटते आणि ज्यांच्या सहवासांतले क्षण मनांत दीर्घ-काल रेंगाळतात ते स्नेही बकुळीच्या, मोगऱ्याच्या बहराच्या रूपांत इथं हजर आहेत.

संध्याकाळची वेळ असते. थकून भागून मी घरीं परत येतों. मी परत आलों की, माझ्या छोट्या बाळांची रेशमी अन् गुलाबी हातांची मिठी पडते मला. त्यांच्या भुरभुरणाऱ्या केसरांसारख्या सुगंधित जावळाचं मी अवघ्राण करतों. त्यांच्या कपोलांच्या काश्मिरी गुलाबांचं चुंबन घेतों. त्यांच्या दन्तमुकुलांचं दर्शन माझ्या मनाला आनंदाचं उधाण आणतं. आणि मला नन्दनवन अक्षरशः दोन बोटं उरतं.

♣ ♣ ♣

# आठ अठ्ठावीस व सहा पांच

तुम्ही जर मुंबई उपनगरांतले रहिवासी असाल तर हे आंकडे तुम्हांला लगेच समजतील; पण आपण जर सोलापूर, कोल्हापूरकडील असाल तर या आंकड्यांतील जादू, त्यांची मौज आणि त्यांतील दुःखं तुमच्या लक्षांत यायचीं नाहीत.

मुंबईंतलीं माणसं नेहमी गडबडींत असतात, धांदलींत असतात. त्यांना बोलायलासुद्धा वेळ नसतो. त्यांच्या बोलण्यांतले अनेक शब्द संक्षिप्त असतात. संदर्भाशिवाय कुणाला कळायचे नाहीत ते. टी एक्स आर्, आय् एल् ओ, ३०५ अप, मिस् टी. के. असलीं संक्षिप्त रूपंच फार. मुंबईकराचं जीवन खरोखरीच मोठं संक्षिप्त झालं आहे. आणि म्हणून तर आठ अठ्ठावीस आणि आठ चव्वेचाळीस असलं सारं त्याला प्रिय आहे.

पण तसंच पाहिलं तर आंकड्यांची ही भाषा मुंबईकरांना फार प्रिय आहे. कुणी तर दिवसरात्र आंकड्यांशीं खेळत असतो, कुणी तर आंकड्यांकडे लक्ष राहून असतो. आंकडा लागण्याचं भाग्य थोड्यांचं. हरणारे बरेच. घड्याळांतले कांटे ठराविक आंकड्यांवर आले की त्यांची होणारी धांदल पाहा. घड्याळावरच्या अंकावर त्यांचं जीवन खेळत आहे, वाढतं आहे, संपतं आहे.

ही आठ अठ्ठावीसची गाडी पकडायची म्हणजे कोण यातायात !

तो पहिली काळजी घेतो घड्याळ पुढं ठेवायची. त्याच्या घरांतलं घड्याळ चांगलं पंधरा-वीस मिनिटं पुढं ठेवतो. त्याला तें ठाऊक असतं. आणि त्याच्या घरांतल्या मंडळींनाहि तें ठाऊक आहे. त्यांना खरी वेळ ठाऊक आहे आणि खोटी वेळहि ठाऊक आहे. तरी पण या खोट्या खेळांत त्यांना समाधान आहे.

हा सकाळीं उठला की, तेव्हापासूनच त्याची धांदल सुरू होते आहे. त्याला ही गाडी पकडायची आहे. त्याला घरांतल्या वस्तु आणायला वेळ नाही. त्याचं मन भारी अस्वस्थ आहे. वृत्तपत्र किंवा मासिकाची घडी एका हातांत आणि दुसऱ्या हातांत खरकटं घेऊन तो धावतो आहे. शेवटून तिसरा डबा, त्यांतली या बाजूची दुसरी खिडकी जवळची जागा त्याला पकडायची आहे. तिथं तो एम्. टी. आर. ची वाट पाहणार आहे. जोश्याची वाट पाहणार आहे. ती एक हडकुळी दोन शेपटेवाली मिस् दंडवते सुरकत येणार आहे, तिची धांदल तो पाहणार आहे. हा डबा आणि ही जागा धरण्यांत एक दूरदृष्टि आहे. ज्या स्टेशनवर त्याला उतरायचं आहे तिथं हा डबा नेमका जिन्यापाशीं येतो. आपल्या व्यवहारनिपुणतेचं त्याला मोठं कौतुक.

ही आठ अठ्ठावीस पकडण्यासाठी तो झपझप चालला आहे. वाटेंत तो इकडे तिकडे पाहत नाही तरी पण ठराविक कोपऱ्यावर तो उभा राहिल्या-सारखं करतो. हात उचलून नमस्कार केल्यासारखं करतो. तिथं देऊळ आहे. वाटेंत कुणी भेटलं, त्यानं कांही पुसलं तर तो ओरडून सांगतो आहे, " संध्याकाळीं भेट. सहा पांचनं येतों आहें."

त्याला ही गाडी पकडायची आहे. इथं रमीचा अड्डा जमणार आहे. गाड्या वेळेवर सुटत नाहीत. पोचत नाहीत. त्यांचे डाव संपत नाहीत. शेवटचे

चार डील प्लॅटफॉर्मवर उभ्या उभ्या होतात ! त्या रमेथानं "क्वीन कव्हर करायला हवी होती." "तुला एसेस् दाखवायला काय झालं ?" त्याला गाडी मिळाली आहे, पण तो डाव हरला आहे !

या आठ अठ्ठावीसवाल्यांना वेळ मिळतो तो फक्त या लोकलच्या प्रवासांत. इथं काय जो पाऊण एक तास मिळेल तेवढा. या वेळांत कुणाचं वाचन चालतं. या वेळांत त्यांचं राजकारण. त्यांची समाजसेवेची तळमळ व्यक्त होते. गावांतील व्यक्ति व संस्था यांवर त्याला टीका करायला इथं संधि मिळते. गावांतल्या बातम्या व घटना इथं चघळल्या जातात. एका अर्थानं याच तासभराच्या काळांत ते गावांत असतात. ज्या वेळेला ते गावांत असतात तेव्हा गप्पा मारतात ऑफीसमधल्या घटनांच्या. कुणाची रजा, कुणाचं प्रमोशन, कसला तरी जी. आर. आणि एखाद्याची सीनिऑरिटी. कुणा चंचलेचं लफडं अन् मोटवानीचं प्रकरण ! ते ऑफिसमधे असतात त्या वेळीं ते बोलत असतात रंगभवनमधल्या न रंगलेल्या कार्यक्रमाबद्दल, नव्या अठ्ठावन्नाव्या कादंबरीबद्दल !

साडेचार वाजले की, सहा पांचचे वेध लागतात. क्षुद्र जीवनांतली ती क्षुद्र धडपड. ती वळवळ, ती धावपळ पुन्हा सुरू होते. त्यांना गाडी पकडायची आहे सहा पांचची. फास्ट आहे म्हणे. घुसावं लागतं. जागा मिळवायला चलाखी लागते. ऑफसाइडनं चढण्याचं शास्त्र व तंत्र अवगत असावं लागतं. सारं जीवन गाड्या पकडण्यांत चाललं आहे. घड्याळांतले काटे. ती सहा पांचची वेळ साधली पाहिजे. ते काळाच्या मागं लागले आहेत की काळ त्यांच्यामागं — कुणास ठाऊक ?

अजून त्याला 'काल' सापडलेला नाही. सम साधलेली नाही. त्याचं ते ढापणं लावून पळणं, त्याची ती क्षुद्र बेचैनी, जागेची विवंचना, रटाळ विषयांचीं चर्वितचर्वण...

आठ अठ्ठावीस, सहा पांच आठ अठ्ठावीस, सहा पांच असा कशासाठी पोटासाठी या तालावर आवाज करीत गाड्या धावताहेत. नीरसपणे ! शुष्कपणे !

♣ ♣ ♣

# पांची बोटें

परवाचा प्रसंग. ब्लेडनं मी कागद कापीत होतों आणि कसं कुणास ठाऊक पण माझं उजव्या हाताचं मधलं बोट कापलं गेलं. बराच वेळ रक्त थांबलं नाही.

माझ्या बहिणीनं पटकन चिंधी फाडली आणि बोट बांधून ठेवलं. अमळशानं बोटाच्या वेदना कमी झाल्या. पण दुपारीं मी जेवायला बसलों तेव्हा मला आढळून आलं की, माझ्या कापलेल्या बोटाला मिठाचा, तिखटाचा, साध्या पाण्याचा स्पर्शहि सोसवत नाही ! जेवतांना सवयीप्रमाणं सारखंच तेंच बोट पुढं पुढं येत होतं. शेवटीं मला जेवण्यासाठी चमचा घ्यावा लागला !

एखाद्या वस्तूची किंमत तिच्या अभावानं अधिक लक्षांत येते असं म्हणतात तें कांही खोटं नाही.

दुपारीं मी पत्र लिहायला बसलों तेव्हा तोच अनुभव आला. लिहायचं काम म्हणजे फार तर दोन किंवा तीन बोटांचं काम. पण लेखणीला पांचालीप्रमाणं पांचहि बोटांचा आधार लागतो. (आणि कधी कधी ती कर्णावरहि अनुरक्त होते.) इतकंच नाही तर डाव्या हाताच्या बोटांनी कागदहि धरावा लागतो. हा काय आपल्याला अनुभव नाही? सगळ्या बोटांचं महत्त्व सारखंच आहे.

पण संध्याकाळीं बाजारांतून आंबे आणतांना आंबेवालीनं मला आंब्याची निवड करूं दिली नाही. सरसकट घ्या म्हणाली. कांही लहान, कांही मोठे. तिनं नेहमीच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला आणि म्हणाली, "साहेब, काय पांचीं बोटं सारखीं असतात व्हय? कांही डावं-उजवं असायचंच की!"

तरी पण मला वाटतं की, सगळ्या बोटांचं महत्त्व सारखं कां मानूं नये?

एवढीशी चिमुरडी करांगुली! तिच्यांत देखील गोवर्धन उचलण्याचं सामर्थ्य असूं शकतं. तिला का कमी लेखायचं?

ही अनामिका – अनेक वेळा गणना करतांना, एखाद्या व्यक्तीचं अद्वितीयत्व सिद्ध करतांना सार्थ ठरली आहे!

ही तर्जनी. आज्ञापिण्यांत हिच्याइतकं श्रेष्ठत्व कुणांत आहे? यशोदेनं श्रीकृष्णाला बजावलं, "माती खायची नाही हं कृष्णा–" तेव्हा त्याच्यापुढं तर्जनी कशी नाचवली असेल याचं एक गोड चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं आहे.

श्रीकृष्ण कौरवांच्या दरबारांत जेव्हा शिष्टाई करायला गेला तेव्हा त्यानं धृतराष्ट्राला बजावलं असेल, "सावधान! – राजा, तुझं अधःपतन होत आहे. तुझ्या पुत्रांना, पौत्रांना इशारा द. संभाळ त्याला." श्रीकृष्णाची त्या चित्रांतील तर्जनी मला दिसते आहे.

आईचीं बोटं धरीत एक पाय नाचवीत कुणी मुकुंद उभा राहायला शिकतो आहे. पावलं टाकायला शिकतो आहे! तर्जनी करांगुलीपेक्षा आणि अनामिकेपेक्षा का कमी महत्त्वाची? बोटांच्या मुद्रांतून अनेक भाव नर्तकांनी सिद्ध केले आहेत! केवळ अंगुलीनिर्देशानं काय काय साधलं आहे?

हा अंगठा. अंगठेबहाद्दुरांना आपण हिणवतों. अंगठा देणारे आणि अंगठा दाखवणारे आपल्या तिरस्काराचे विषय होतात. पण अंगठ्याचं महत्त्व का कमी आहे ? माणसाप्रमाणं माकडालाहि पांच बोटं आहेत, परंतु ज्या वेळीं माकड आपल्या अंगठ्याचा स्वतंत्रपणें उपयोग करूं लागलें तेव्हा त्याच्यांतलं मनुष्यपण जागं झालं !

मूल जन्माला येतं तेव्हा मूठ मिटून अंगठा बोटांच्या आंत मिटून ! मुलाची जशी जशी वाढ होते तशी तशी त्या प्रमाणांत त्याचा अंगठा स्वतंत्र होतो. अंगठ्याची ही मूर्ति लहान असली तरी त्याची कीर्ति मोठी आहे. या अंगठ्याच्या ठेवणीवरून आणि ठशांवरून हवी असलेली व्यक्ति लाखांतून शोधून काढतां येते !

कुणा स्तोत्रकारानं करदर्शनाचं महत्त्व आवर्जून सांगितलं आहे. त्यानं म्हटलं आहे, “ कराग्रे वसते लक्ष्मी – ” हें त्यानं कोणत्या अर्थानं म्हटलं आहे कुणास ठाऊक ? खरं पाहिलं तर कारकुनांच्या आणि सरस्वतीभक्तांच्या कराग्रांतून स्रवली आहे ? उलट ऐदी व मूर्ख श्रीमंतांच्या बोटांवर नाचले आहे. कधी त्यांनाहि आपल्या बोटांवर नाचवते आहे ! ! या बोटावरचं कुंकू त्या बोटावर सफाईनं नेणारे नफाखोर असतात ना ? त्यांच्या लठ्ठ बोटांत सुवर्ण मुद्रिका पाहा कशा रुतून बसल्या आहेत ! लक्ष्मी चंचल आहे आणि हातांचीं बोटं लवचिक आहेत म्हणून त्या स्तोत्रकारनं कराग्रीं लक्ष्मी आहे असं मानलं असावं. तरीहि त्यानं बोटाबोटांत फरक मानलेला नाही.

एखाद्या रविशंकराला अगर फिडल-दिलरुबा वाजवणाराला विचारून पाहा बरं. तीं वाद्यं वाजतांना हें बोट महत्त्वाचं नि हे कमी महत्त्वाचं असं कसं मानतां येईल त्यांना ? एखादी मींड घ्यायची आहे – तान निर्माण करायची आहे, हव्या त्या तारा आणि पडदे दाबायचे आहेत, योग्य ते स्वर अनुकंपित करायचे आहेत त्याला सगळ्याच बोटांची मदत हवी आहे ! तबलजीला सारीं बोटं हवीं आहेत सारख्या मोलानं ! !

धनुर्धराला डाव्या हाताची मूठ हवी आहे, उजव्या हाताचींहि बोटं हवीं आहेत !

आठवतं मला बोटांचं मार्दवदेखील. दुधाच्या सायीहून मऊमऊ असलेलीं आईचीं बोटं मला आठवतात. भाऊबिजेच्या मंगल प्रभातीं माझ्या

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत

ताईच्या स्निग्ध बोटांचा स्पर्श मला आठवतो. कित्येक वेळीं पहाटे प्रियेनं माझ्या केसांतून हळुवारपणानं बोटं फिरवून मला कशी हळूच जाग आणली तें स्मरतं. माझ्या बाळाच्या गालावर त्याची आई जेव्हा गाल-बोट टेकते तेव्हा माझ्या मनांत आनंदोर्मि उसळतात. हीं सारीं सुखदृश्यं मनांत दाटलीं की स्वर्गहि दोनच बोटं उरतो.

मग मी हीं पांचहि बोटं सारखीं कां मानूं नको? प्रत्येक बोटाचं काम कारणपरत्वें भिन्न आहे म्हणून का आपण पांची बोटं सारखीं नाहीत असं म्हणायचं?

श्वा युवा मघवा या भिन्न वस्तूंतदेखील व्याकरणकारांनीं समानता पाहिली. मग हीं तर आपल्याच हातांचीं पांच बोटं! त्यांच्यांत आपण समानता कां शोधूं नये? आणि दुसऱ्या अर्थानं पांची बोटं सारखींच असतात असं कां म्हणूं नये?

♣ ♣ ♣

# ओझेवाले

ऐन उन्हाळ्याचे दिवस होते. तापलेल्या काळ्याभोर डांबरी रस्त्यावरून एक हमाल अनवाणी चालला होता. त्याच्या डोक्यावर भलं मोठं ओझं होतं. त्याच्याकडे पाहतांच मला त्याची दया आली. अरेरे ! गरीब बिचारा !

डोक्यावरच्या मुंडाशाचा पदर लोंबत होता. कपाळावरून निथळणारा घाम एका हातानं तो पुशीत होता आणि दुसऱ्या हातानं डोक्यावरल्या बॅग-होल्डॉलला त्यानं आधार दिला होता. दुपारची वेळ होती. रस्त्यानं रहदारी नव्हती विशेष. तो चालला होता. त्या ओझेवाल्याला पाहतांच माझ्या मनांत मानवता, पिळवणूक, विषमता, अन्याय, साम्यवादी समाज-रचना असल्या शब्दांची एकवार फैर झडली !

माझ्याच काय, हल्ली प्रत्येकाच्याच मनांत असलं कांही तरी शब्दांचं वादळ उठून जातं. आणि क्षणभरानं तें शांत होतं. त्याचा काही परिणाम होत नाही. क्षण दोन क्षण मीं त्या हमालाकडे पाहिलं आणि विसरून गेलों त्याला.

आता माझ्या डोळ्यासमोर तो पुन्हा उभा आहे. पण अगदी निराळ्या संदर्भांत. सगळीकडे मला ओझेवाले दिसत होते.

तो पाहा शेष. पृथ्वीचा भार तोलून अनंत काळ उभा आहे. आकाश कोसळूं नये म्हणून ॲटलस तें खांद्यावर घेऊन उभा आहे. पं. नेहरू आणि मॅक्मिलन आणि इतर यांनी राष्ट्रांची धुरा आपल्या वृषस्कंधावर घेतली आहे. हेहि ओझेवालेच.

आपल्या पोटासाठी उपसावे लागणारे कष्ट ज्यांच्या पाठीवर आहेत अशीं वांकलेलीं हीं दीनदुबळीं माणसं! पोटाची काळजी ज्यांना सदा वहावी लागते अशी, देवाचं गांठोडं बांधून या गावाहून त्या गावाला जाणारी ती लमाणांची टोळी – !

आपल्या पोटाचा भार आपल्याला उचलत नाही म्हणून सेवकांच्या खांद्यांवर रेलून चालणारे तुंदिलतनु पुंजीपति.

ओझेवाले ! सारे ओझेवाले !

" हें ओझं तुम्ही घेतां का ? " म्हणून कुणी त्या कामगारांना विचारलं होतं का ? त्यांच्यावर तें कुणी तरी लादलं आणि त्यांना तें स्वीकारावं लागलं आहे. कांहींनी हें ओझं आपण होऊन घेतलं आहे, पण आता तें त्यांना टाकतां येण्यासारखं नाही ! क्रमशः तीं ओझीं वाढत गेलीं आहेत. त्या-बद्दल त्यांचा गौरव आज होतो आहे, पण उद्यां कुणास ठाऊक, त्यांना काय बक्षिस मिळेल तें ! त्यांनी तो बोजा टाकला तर ती त्यांची आत्महत्या ठरेल !

कांहींना लाभलेलं ओझं हें त्याचं भाग्य आहे. झाडांना आपल्या फळांचं ओझं वाटत नाही. त्यांच्या जीवनाचा नैसर्गिक विकास आहे तो. हें ओझं त्यांनी आपणहून घेतलं आहे. तें ओझं दुसऱ्याला देण्यांत निरुपम आनंद आहे. आणि म्हणून ते उचलण्यांत आनंद असावा.

ग्रीष्मदाहानं करपलेल्या वसुंधरेला शांत करण्यासाठी आतुर झालेली व बाष्पभारानं लवलेली ही कृष्णघनमाला तिच्या ओझ्यामुळं सुंदर वाटते आहे.

पण आमच्यापैकीं अनेकांना ओझीं वाहावीं लागतात तीं चिंतांची आणि तीं घेऊन अखेरपर्यंत अगदी चितेपर्यंत चालावं लागतं. ज्या प्रश्नांचीं उत्तरं सापडत नाहीत, ज्या प्रश्नांचीं उत्तरं अनिश्चितपणा व असुरक्षितपणा यांत गुरफटलेलीं असतात ते प्रश्न नेहमीच असह्य अशीं ओझीं होऊन बसतात मानगुटीला !

लाख रुपयांचे दोन लाख रुपये कसे होतील ही चिंता. मुलीचं लग्न कसं होईल ही चिंता. पुढं ती सासरीं कशी वागेल ह्याची काळजी. लोकांला आपण फसवलं, लुबाडलं त्याबद्दल आपल्याला कुणापुढं तरी जाब द्यावा लागेल ही मनांतली टोचणी. कुठल्या तरी क्षुल्लक प्रश्नावरून दोन देशांतून कटकटी होतील— ही भीति—

एक अन् दोन—अनेक प्रश्न. आणि त्यांचीं अनेक उत्तरं ! आत्मपरीक्षण केलं तर ' कांही ' प्रश्नांचीं उत्तरं मिळतीलदेखील ! आणि सापडलेल्या उत्तरांनी प्रश्नांना छेद देणं शक्य आहे. पण आम्ही चिंतेनं चिंता वाढवतों. ओझ्यानं ओझं वाढत जातं.

त्या दिवशीं पाहिलेल्या ओझेवाल्या हमालाचा विषय माझ्या मनांत फार जड होऊं लागला. पेपरवेटसारखा. त्या मनांतल्या ओझेवाल्याला मी रस्त्यावर ठेवला. आणि त्याला सांगितलं, ' चाल, बाबा. '

मी त्याला उपदेशाचे डोस दिले नाहीत. त्याच्याबद्दल शाब्दिक सहानुभूति दाखविली नाही. " चाल बाबा, एकटाच चाल । " असलं काव्य रचलं नाही. कारण मला ठाऊक आहे याचा कांही उपयोग नाही.

पं. नेहरूंचं, एखाद्या लक्ष्मीपतीचं, एखाद्या वधूपित्याचं, एखाद्या हमालाचं ओझं कमी करायचं म्हणजे समाजांत आमूलाग्र बदल करावा लागेल. आणि समाजांत आमूलाग्र बदल करण्याचं ओझं मी कशाला घेऊं.

आणि समजा, या प्रकारचं ओझं मीं घेतलं तरी समाजांत दुसरीं आणखी कसल्या तरी तऱ्हेचीं ओझीं तयार होणार नाहीत हें तरी कशावरून ? ओझेवाल्यांचीं ओझीं का कायमचीं नष्ट होणार आहेत ? आणि तीं नष्ट केलीं पाहिजेत असा आग्रह तरी कुणी अन् कां धरावा ?

♣ ♣ ♣

# आषाढीचें खिन्न चांदणें—

वाऱ्याचा मोठा थोरला झोत आंत आला. खिडकीचीं दारं एकमेकांवर आदळूं लागलीं. वाऱ्याबरोबर पावसाचे कांही तुषार पण आंत आले. त्या वाऱ्याने दिवा मालवला गेला आणि मग 'गीतारहस्या'चं पुस्तक मिटून ठेवून उठावंच लागलं मला.

खिडकीपाशीं आलों आणि बाहेर डोकावून पाहिलं. आकाशांत उदासवाणा चंद्र चांगला माथ्यावर आला होता. त्याच्याभोवती कृष्ण मेघांनी गर्दी केली होती आणि एक मोठं खळं पडलं होतं. कसली तरी अशुभ आशंका मनाला स्पर्शून गेली. शरीरावर काटा थरथरला आणि मनहि शहारून गेलं.

मनाला उगाचच उदास वाटूं लागलं. आत्ताच स्थितप्रज्ञाचीं लक्षणं वाचत होतों. खरं म्हणजे माझं मन आकाशांतल्या एवढ्याशा दृश्यानं उदास व्हायला नको होतं. चंद्राभोवतीचं खळं आणि त्याचा मानवी जगावर

परिणाम, जगांतील सत्ताधीशांना तें अशुभ असल्याची आपली खुळी कल्पना– यांत माझ्या मनाला बावरण्यासारखं काय होतं? सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ–अशी मनोवृत्ति धारण करण्याऱ्या स्थितप्रज्ञाचं वर्णन आत्तांच वाचलं ना?

पण छे! मला तर या उदास चंद्राबद्दल विलक्षण सहानुभूति वाटते आहे. बिचारा! केवढ्या आपत्तींशीं झुंजतो आहे! एकाकी!! हे घोंघावणारे वारे ढगांना प्रोत्साहन देत आहेत आणि बेऱ्या चंद्रा, ते तुझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत आहेत. या वादळी वाऱ्यानं नेहमी शांत असणारा समुद्र पहा कसा खवळला आहे तो. नेहमी तुझं प्रतिबिंब आपल्या हृदयांत धारण करणारा हा सागर तुझ्याविरुद्ध उलटला आहे. आणि तुला खाऊं का गिळूं या भावनेनं तुझ्याविरुद्ध तो जणू उभा आहे. त्याच्या लाटा आकाशापर्यंत उसळत आहेत.

एकाकी चंद्रा, निराश होऊं नकोस! खिन्न होऊं नकोस! हे मेघ या पृथ्वीला छेडीत आहेत. आपल्या शीत व तीक्ष्ण जलधारांनी तिला वेष्टीत आहेत. त्यांच्या गर्जनांनी तिचा थरकाप उडाला आहे. आपल्या हातांतील विजेच्या फटकाऱ्यांनी त्यांनी असं थैमान घातलं आहे की, वाटतं ही पृथ्वी आता दुभंगणार की काय? ती शरदीय वसुंधरा कुठं आणि ही मलिन मेदिनी कुठं? पिवळ्या बुट्ट्यांचा हिरवा शालू नेसून अन् शुभ्र जलधारांच्या मौक्तिकमाला घालून मिरवणारी ती प्रौढ पुरंध्री मी पाहिली आहे. नवा फिकट कुसुंबी रंगाचा परकर नेसून सकाळच्या सोनेरी उन्हांत बागडणारी अवखळ पोरगी पाहिली आहे. आपल्या निद्रिस्त लेकराच्या अंगावरचं पांघरूण नीट करीत, त्याला थोपटीत अंगाई गीत गाणारी मातृस्वरूप धरणी मी पाहिली आहे. कुठं तीं रूपं आणि हे उदास, कषायवेषधारी त्रस्त रूप कुठं? चंद्रा, हिचं हें रूप पाहून तुझा उदासपणा आणखीनच वाढला असावा.

हीं झाडं पाहा. किती व्याकुळ झालीं आहेत तीं. पाहा पाहा. गरीब बिचारीं. तो दुष्ट वारा त्यांच्या अंगाअंगाला झोंबतो आहे. त्यांच्या पानापानांतून, फांद्याफांद्यांतून सुयांसारखीं आपलीं तीक्ष्ण बोटं खुपसतो आहे. लतांचं पानन् पान विंचरून निघतं आहे. किती घाबरल्या आहेत त्या. त्यांचे प्राण

जणु त्यांच्या डोळ्यांत आले आहेत. नव्यानं अंकुरणाऱ्या बिया वर डोकावून पाहात आहेत. त्यांना कुणीं तरी सांगितलं होतं 'हें जग फार सुंदर आहे' म्हणून, हें जग फार चांगलं आहे म्हणून. पण आज त्या डोळे उघडून पाहतील तेव्हा त्यांना काय दिसेल? अंधार... चिखल... अंग कापत जाणारा गार गार वारा. अंगावर चाल करून येणारे किळसवाणे कृमीकीटक!

कलापती आणि मनोहारी म्हणून त्यांनी तुझं वर्णन कुणीं त्यांना ऐकवलं आहे, पण तूं त्यांना कसा दिसशील? क्षीण, कलाहीन– उदास! जिकडे तिकडे कुंदपणा आला आहे. लाकडाच्या प्रत्येक तुकड्याला बुरशी आली आहे. दगडाधोंड्यावर शेवाळ धरलं आहे. पाणी इतकं गढुळलं आहे की, बोलायची सोय नाही. सारं कसं पार बिघडून गेलं आहे. पक्ष्यांचं मधुर कूजन कुठं ऐकूं येत नाही. फुलांचा धुंद मंद सुगंध कुठं दरवळत नाही. एकहि चांदणी आपल्या संथ, पवित्र तेजानं आपलं दर्शन देत नाही. काय रे हे चंद्रा? तुझ्या राज्यांत इतका निरुत्साह? तुझ्याकडे अगदी बघवत नाहीं!

केशवसुतांची 'काळोखाची रजनी होती' या पद्यपंक्तीची आठवण येते! मन शोधूं लागत आहे. 'तम अल्प द्युति बहु' हा संदेश. या वेळींहि ते दिड्दा दिड्दा ऐकूं यायला हवे आहेत. या अवेळीहि एखाद्या कोकिळेनं गोड बोल ऐकवायला हवे आहेत. या काळोखांतहि सारंगीचे सूर छेदीत जाणारा आणि विश्वाला नवसंजीवन देणारा सारंगीवाला कुठून तरी यायला हवा आहे.

पण अं ऽ हं – बाहेरून कुठून येणार हा सारंगीवाला? स्थितप्रज्ञानं तो मनांतल्या मनांतच निर्माण करायला पाहिजे.

या विचारानं मनाला जरा बरं वाटलं. मीं पुन्हा चंद्राकडे पाहिलं. अरे शशांका, एवढा निराश कां होतोस? उदास कशाला होतोस? अरे, याहि रात्री जातील. असं अराजक, असं नैराश्य निर्माण झाल्याविना का नव्याची निर्मिति होते? हो, आधी चिखल तुडवला जातो तेव्हाच ना त्याला सुबक घाट येतो? थोडा वेळ धीर धर. हां हां म्हणतां ही कष्टदशा जाईल.

मग हरिततृणांचा मखमाली वेष धारण केलेला श्रावण येईल ! खवळलेला सागर शान्त होईल. गढूळलेलं पाणी स्फटिकासारखं शुभ्र होईल. तुझ्या स्वागतासाठी सांयकाळीं आकाशांत बलाकमाला दिसूं लागतील. नाना रंगांनी व विविध सुगंधांनी पृथ्वी नटेल. मग सोनेरी मुकुट घालून राजैश्वर्यासह आश्विन येईल.

मग तुझ्या शारदीय सौंदर्याची शोभा काय वर्णावी ? आता तुझं राज्य सुरू होईल. तुझ्या तेजाला ‘ सतरावी कळा ’ चढेल.

या कल्पनांनीदेखील बरं वाटलं. अंमळशानं चंद्राभोवतालचे ढग पांगले गेले.

चंद्र माझ्याकडे पाहूं लागला. बेट्याला जसे कांही माझ्या मनांतले विचार समजलेच होते !

♣ ♣ ♣

# वादळ

अकस्मात् वारं सुटतं. इतका वेळ अंगाची तगमग तगमग होत असते. ती थोडी शांत होते. भराभरा इकडून तिकडून ढग जमतात. आकाश अंधारून येतं. सारी धूळ वर उचलली जाते. वाऱ्याला चक्राकार गति येते. त्या गतिचक्रांत धूळ, पाला, पाचोळा गरगरा फिरूं लागतो. उंचउंच जातो आणि विरतो. वारा भिंगरीसारखा स्वतःभोवती फिरत असतो. त्याचा स्वतःचा एक प्रचंड घोंघावा निर्माण होतो. त्या आवाजानं त्याच्या मूळच्या उग्रतेंत आणखीनच भर पडते. सोसाट्यानं हिंदकळणाऱ्या झाडांच्या फांद्यांवर पाखरं कसा तरी तोल सावरतात. आकाशांत उंच गेलेल्या घारी कर्कश चीत्कारत घरट्यांकडे परततात. झाडांच्या माथ्यावरचीं काटक्यांनी तयार केलेलीं घरटीं विस्कटून जातात. पक्ष्यांचीं जोडपीं बिलगून बिलगून बसलेलीं असतात. एकमेकांना धीर

देतात. कांही तरी प्रचंड चाललं आहे याची त्यांना जाणीव आहे. परंतु असंच मागं वादळ झालं होतं याची त्यांना आठवण नाही. वादळानंतर काय होईल याची त्यांना कल्पना नाही. भीति नाही.

झाडांच्या लहान लहान फांद्या जोरजोरानं हलत आहेत. त्यावरचीं मोठीं, काल परवा फुलून आज जरा सुकलेलीं फुलं गळून पडत आहेत. कांही मोठ्या फुलांच्या बाहेरच्या पाकळ्यांचा सडा होतो आहे. लहान कळ्या अजून देठाला धरून आहेत. रस्ता निर्मनुष्य झाला आहे. गावाबाहेरची एस्. टी.ची ही सडक आहे. दुतर्फा जांभळीचीं झाडं आहेत. पाचव्या फर्लांगाच्या जवळ वडारांचा मोठा तळ पडला आहे. वादळ सुरू होतं तेव्हा त्यांच्या झोपड्या हादरतात. एक विटकं निशाण आहे तें वाऱ्यानं फडफडतं. तें एका काठीला बांधलं आहे. ती काठी वाकते. भराभरा आपला संसार ते आवरतात. एका टिनच्या मोठ्या पेटींत भरतात. बारदानांत गुंडाळतात ! मध्येच वाऱ्याचा वेग कमी झालासा वाटतो. त्या वडारांचीं एक-दोन पोरं, थोरांची नजर चुकवून रस्त्याकडे धावतात. मागून सारीं पोरं धावतात रस्त्यावर जांभळांचा सडा पडला आहे. फार उंचीवरून पक्कीं जांभळं पडलीं आहेत. तीं ठेचाळलीं आहेत. कांहींना माती लागली आहे. कांही अगदी कच्चीं आहेत. वारा वाहतोच आहे. वरून पानं, काटक्या, जांभळं. यांचा वर्षाव होतो आहे. पोरं आनंदानं नाचत आहेत. त्यांना मेजवानी मिळाली आहे. कांही बाया आणि तरुण मुलीहि धांवल्या आहेत.

आतां पाऊस पडूं लागला आहे. सारीं भिजून चिंब होत आहेत. पोरांचीं नग्न शरीरं स्वच्छ झालेलीं आहेत. कित्येक दिवसांत त्यांनी स्नान केलेलं नाही. तीं पोरं मोठीं तुकतुकीत दिसायला लागतात. त्या वडारांच्या तरुण मुलीहि त्या पावसांत भिजत आहेत. त्यांचे विकसणारे अवयव अनावृत आहेत. त्याचं त्यांना कांही वाटत नाही.

वादळी पाऊस वाढतो आहे. रस्त्याच्या कडेला लावलेलीं झाडं दचकत आहेत. त्यांच्याभोवती डांबराचीं रिकामी पिपं उभीं आहेत. तारांचीं कुंपणं घातलेलीं आहेत. कांही मोठीं आहेत. त्यांच्यावर कुठं नंबर चिकट-वलेले आहेत. कुठं कसल्या जाहिराती !

विजा चमचम करीत आहेत. गरजता पाऊस कोसळतो आहे.

असाच एक कुणी वादळांत सापडला आहे. पण त्याला वादळ हवं आहे. तो राहतो ती चाळ आता दुरवस्थेंत आहे. कौलं उडालीं आहेत. एक भिंत कोसळली आहे. परंतु या वादळांत ती सर्व पडावी असं त्याला वाटतं आहे. असं झालं तरच नवीन चाळ बांधली जाईल अशी त्याची आशा आहे. टेलिफोन, आगगाड्या, दळणवळण सारं बंद पडावं असं त्याच्या मनांत येतं. या श्रीमंतांचे पक्के हाल झाले पाहिजेत. त्यांना पाणी मिळता कामा नये. दूध मिळतां कामा नये. रेडिओ ऐकतां येतां कामा नये. भाजीपाला मिळूं नये. त्याची मोटरगाडी रस्त्यावर पडलेल्या झाडापाशी अडकून राहावी. पाणीच पाणी व्हावं सारीकडे. असले सूडाचे, कांही दुष्टपणाचे विचार करतो आहे.

पण समाजरचना विचित्र आहे. वादळ त्यांना कांही करत नाही. गरीबच बेघर होत आहेत. श्रीमंतांच्या मुलांना मेलिन्स फूड आहे. डब्यां-तलं दूध आहे. रेफ्रीजरेटरमध्ये ताजा भाजीपाला आहे. आगगाडी नसली तर विमानानं जगाच्या कोठल्याहि कोपऱ्यांतून कोठलीहि वस्तु मिळते आहे. घरच्या घरीं चित्रपट आहे, टेपरेकॉर्डर आहे. टेलिव्हिजन आहे. क्षणभराच्या वादळानं त्यांच्या कॉंक्रीटच्या दहा मजली महालांना एवढा सुद्धां धक्का लागलेला नाही !

वादळ होतंच आहे. कुणाला हवं, कुणाला नको याचा विचार तें करतं आहे कुठं ? वीज लखलखते आहे. एका झाडावर ती कोसळली आहे. क्षणांत त्याचा जळून अर्धाकच्चा कोळसा झाला आहे. मोठमोठे टपोरे थेंब सपसप पडताहेत. जमिनीवरची धूळ खाली दबली आहे. तापलेल्या जमिनींतून वाफा निघत आहेत. त्या प्रथम गरम वाटतात. मग शांत वाटतात. पावसाच्या पाण्याचे थेंब गार आहेत !

तासाभरानं वादळ थांबलं आहे. वादळानं वडारांची वस्ती धुऊन काढलेली आहे. त्या कुणा एकाच्या मनांत वादळामुळं जे चमत्कारिक विचारांचं थैमान झालं, उभं राहिलं तें आता शमलं आहे. असल्या वादळांनी कांही समाजक्रान्ति होत नाही. फार तर क्षणभर गैरसोय होईल इतकंच.

वादळांत आपण तेवढं सुरक्षित राहावं आणि इतरांची मात्र खूप नुकसानी व्हावी हें कसं घडावं ? निसर्गाला तें मंजूर नाही.

पाऊस आता कमी कमी होत चालला आहे. बरीचशी घाण वाहून गेली आहे. पण बरीचशी इथं तिथं साचूनहि राहिली आहे.

रस्ते धुतले गेले आहेत. मघाशी रस्त्याच्या कडेला पडलेलीं जांभळं पाण्यांत वाहून गेलीं आहेत. तीं वडाराचीं पोरं आणि बायकाबाप्ये पुन्हा पालं बांधण्याच्या तयारीला लागलीं आहेत. पाखरं पंख फडफडवीत बाहेर पडलीं आहेत. चोचीनं आपलीं पिसं साफ करीत आहेत. टेलिफोनच्या तारेवर एका ओळींत बसलीं आहेत. त्यांच्या घरट्यांचा विध्वंस झाला आहे. तीं पुन्हा बांधायचीं आहेत त्यांना.

वादळ आलं होतं ! वादळ गेलं आहे ! संपलं आहे !

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# ते तीन तास !

प्रसंग असा होता. एस्. एस्. सी. परीक्षा चालूं होती आणि मी परीक्षेला बसलेल्या उमेदवारांच्या एका वर्गावर पर्यवेक्षक म्हणून काम करीत होतों !

अकराचा टोला पडला आणि प्रश्न-पत्रिका वांटल्या. अर्ध–एक मिनिट लागलं असेल. अजून दोन तास एकूणसाठ मिनिटं इथं उभं राहायचं होतं. मुलांच्यावर देखरेख करायची होती. मला हा नवीनच अनुभव होता. परंतु हे तीन तास कसे जायचे याची मोठीच काळजी होती मला. कारण काम कांहीच नव्हतं. मुलंमुली लिहीत होतीं आणि मी नुसताच पाहत होतों, येरझारा घालीत होतों ! वेळ जातां जात नव्हता.

मुलांशीं बोलायचं नव्हतं. तीं काय लिहितात हें पाहायचं नव्हतं. तीं चुकीचं लिहीत होतीं हें दिसलं तरी सांगायचं नव्हतं. त्यांनी उत्तम आकृति

काढली किंवा निबंधाची सुरुवात झक्क केली तरी त्याची प्रशंसा करायची नव्हती ! तोंड मिटून बसायचं तीन तास. कुठं कुणाला पुरवणी लागली तर पुरवणी द्यायची अगर पाण्याची गरज वाटली तर पाणीवाल्याला पुकारायचं ! वेळ कसा जायचा बुवा ! आत्ताशीं एकशेऐंशीं मिनिटांपैकी सहा मिनिटं संपलीं होतीं !

माझं लक्ष गेलं एका मुलीकडे. तिच्या सौंदर्यानं माझं मन वेधलं. सौंदर्यासक्त मनानं—थोड्या निर्लज्जपणानंहि मीं तिच्याकडे पाहिलं. राजरोस पाहिलं. जणू कांही मला तसा परवानाच होता ! तिचीं बोटं नाजुक होतीं आणि ती झरझर लिहीत होती. तिची नजर खाली वळलेली होती. प्राजक्ताच्या देठासारखे ओठ आकुंचित झाले होते. लिहितांना जें थोडं फार आठवावं लागे त्यामुळं कपाळावर अठी पडे, ओठांच्या हालचाली होत ! दोन्ही कानशिलांवरून केस आकर्षक वळण घेऊन कानांच्या पाळ्यांपाशी वळले होते. कर्णभूषणांतील लाल खड्यांचा तांबुस प्रकाश तिच्या गालांवर पडला होता. तिच्या मस्तकाच्या हालचालीबरोबर तोहि मागंपुढं होई ! तिनं मधोमध भांग पाडला होता व तो थेट शेवटपर्यंत नेला होता. एक वेणी पाठीवर होती, तर एक तिनं पुढं घेतली होती व उजव्या वक्षःस्थळापर्यंत आली होती.

मी तिच्या जवळ उभा होतों, परंतु माझी दाद तिनं घेतली नव्हती ! ती लिहिण्यांत चूर होती. तिथं अधिक वेळ उभं राहायची मलाच लाज वाटली आणि मी दुसरीकडे गेलों. मुलांच्या झरण्या झरझर चालल्या होत्या ! त्यांचं भवितव्य त्यांच्या लेखणींतून उतरत होतं. कुणी पास झाले असते. आयुष्यांतला नवा मार्ग कांहींना मोकळा झाला असता. कांही नापास होणार होते. कांहींचं शिक्षण बंद पडणार होतं. यांत कांही मुली होत्या. त्यांचीं लग्नं झालीं असतीं. कुणी कुठं, कुणी कुठं, दूर दूर गेलीं असतीं !

पुन्हा माझं पाऊल त्याच मुलीकडे वळलं. लिहून लिहून थकलेलीं बोटं डेस्कावर ती मुडपीत होती. विचार करीत कुठं तरी पाहत होती. दोन्ही हातांनीं, तिनं पुढं झेपावलेले कुरळे केस मागं लोटले. त्या वेळीं तिनं वर उचलेले बाहू, त्यांची व तिच्या वक्षःस्थळाची हालचाल मला मोठी आकर्षक

वाटली. ती लिहूं लागली. ती पुढच्या डेस्कावर रेलली होती. पुढं लुडबुड-णारा उजव्या स्तनावर आलेला तिचा शेपटा चांगलाच चेपला गेला होता मध्ये !

तूं जें पाहतो आहेस हें सारं निर्लेप मनानं पहातो आहेस ना ? माझ्याशीं मी प्रश्न केला !

पण खरं पाहतां यांत गैर काय होतं ? सुंदर स्त्रियांच्या विभ्रमांतील सौंदर्य घटकाभर नजरेनं लुटणं यांत पाप होतं का ?

एकदां असंच झालं. मी स्टेशनवर गेलों माझ्या मित्राला आणायला आणि स्टेशनवर गेल्यावर कळलं की, गाडी तीन सव्वातीन तास लेट आहे. घरीं माघारीं जाणं शक्य नव्हतं, कारण माझं गाव व स्टेशन यांतील अंतरच मुळी दहा मैल आहे. स्टेशनवर बसणं भागच होतं. मीं वाचायला पुस्तक आणलं नव्हतं बरोबर ! ते तीन तास आता कसे काढायचे हा प्रश्नच होता माझ्यापुढं.

स्टेशनच्या आवारांत प्लॅटफॉर्मवर कांहीं फुलझाडं लावलीं होतीं. त्या फुलझाडांचं मीं निरीक्षण केलं. कांहींचे रंग सुरेख होते, कांहींचे आकार. त्या फुलांपैकी एकहि माझं नव्हतं. मी घेऊं शकत नव्हतों. घ्यावं असं वाटलंहि नाही. त्या फुलांचं कौतुक मी निर्व्याजपणे जर करूं शकलों तर या तरुण मुलीचं सौंदर्य मी तशाच निर्व्याज मनानं कां पाहूं शकणार नाही ?

थोड्या वेळानं त्या प्लॅटफॉर्मवर दोन छोट्या मुली आल्या. स्टेशन-वर राहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या होत्या त्या बहुतेक. दोघींहि युरोपियन होत्या. गोऱ्यागोऱ्यापान होत्या. कापलेल्या केसांचीं झुलपं अशीं मजेदारपणे हालत होतीं. त्यांचे फ्रॉक बरेच आखूड होते आणि त्यांच्या नितळ मांड्या, सुश्लिष्ट पोटऱ्या, नाजुक पावलं हीं दृष्टि खेचून घेत होतीं. त्या धावत होत्या, एकमेकींना पकडत होत्या. कांहीबाही बोलत होत्या — त्यांना जाणीव देखील नव्हती की मी तिथं आहें ! तें स्टेशन बहुतेक निर्मनुष्य होतं. मला खूप वाटलं की, त्या मुलींनी माझ्याजवळ यावं, माझ्याशीं खेळावं — परंतु त्यांना माझी दाद घेण्याचं कारण ?

मघाशी त्या ताटव्यांतल्या फुलांनी माझी दाद घेतली होती का? त्यांनी माझ्याकडे झेप घेतली होती का?

समोरच्या कडुनिंबाच्या झाडावर एक राघू-मैनेचा जोडा बसला होता. मैनेच्या कंठाजवळ राघू चोच घाशीत होता. ती आपल्या मोहक हालचालींनी मान वळवून कधी त्याला साथ देत होती, तर कधी कृतककोपानं दूर जात होती. पुन्हा तो जवळ जायचा. चोचींत चोच घालून कांही बोलायचा. किलबिल करीत दूर जायचीं दोघं आणि फिरून यायचीं तिथंच.

तीं पाखरं माझी दाद घेत होतीं का? मी मात्र त्यांच्या मनोहर हालचालींचं, रंगारूपाचं, प्रणयभावनेचं स्वरूप ओळखून मनांत आनंदित होत होतों. जर या फुलांमुलांच्या, पक्ष्यांच्या विलासांचा आस्वाद मी अगदी अलिप्तपणें घेऊं शकत होतों, तर या मुलीच्या सौंदर्याकडे मी अशाच वृत्तीनं कां पाहायला नको?

पुन्हा एक फेरी मारली आणि मी त्याच मुलीजवळ येऊन उभा राहिलों. तें सौंदर्य आता शिणलं होतं. बाहू गळले होते. कपाळावर घामाचे थेंब उभे राहिले होते. लिहिण्याचा वेग मंदावला होता. ती थांबली. लिहिलेले कागद जुळण्यापूर्वीं तिनं खांद्यावरून ढळलेला पदर सारखा केला.

तिच्या गालांचे गुलाब आता कोमेजले होते. तिच्या केसांची तकाकी कमी झाली होती. ओठ सुकले होते. डोळ्यांत शीण भरला होता——

तरीहि ती सुंदर दिसत होती. श्रान्त सौंदर्य कांही कमी सुंदर नसतं. अनेक सुखद गोष्टींच्या यादींत भर्तृहरीनं मदक्षीण हत्ती व रतिश्रान्त वधूचा समावेश केला तो का उगाच केला असेल?

त्या मुलीनं मला बोलावलं आणि पाणी मागितलं. मला बरं वाटलं!

आता थोडाच वेळ उरला होता. आणखी कांही क्षणांनी ती कुठं तरी जाणार होती आणि मी दूर कुठं तरी. पुन्हा ती मला कधी भेटलीहि नसती. आणि आज या गोष्टीला अनेक वर्षं झालीं ती भेटलेलीहि नाही.

मी तिच्याकडे पाहत होतों. जसा त्या स्टेशनवरच्या फुलांकडे पाहत होतों. त्या विदेशी मुलींकडे पाहत होतों, त्या काममोहित पक्ष्यांच्या प्रणय-क्रीडांकडे पाहत होतों तसा. ती लिहून झालेलं वाचीत होती, तपाशीत होती. वाचतांना तिच्या ओठांची मनोहर हालचाल व्हायची ! तिनं जांभई दिली. आणि तिनं आपल्या डाव्या हाताचीं तीन बोटं तोंडावर धरलीं-- !

घंटा झाली. जे तीन तास कसे जातील असा मला प्रश्न पडला होता ते तीन तास निघून गेले होते. गाडी स्टेशनांत येत होती.

माझं मन फिरुन माझं झालं होतं !

♣ ♣ ♣

# गोष्ट आहे एका संध्याकाळची !

गाई घरां आल्या. शुभ गोरज सर्वत्र उधळले. मन धुंदावलं. अस्वस्थ झालं. पाखरं निज कोटरीं परतलीं. गोठ्यांतलीं वासरं पुढं धावलीं. गाईंना पान्हा फुटला. गाईंच्या गळ्यांतल्या घंटा वाजत होत्या. गाईंच्या धारा चरवींत झुरूमुरू झुरूमुरू वाजत होत्या.

गोष्ट आहे एका संध्याकाळची. गाई घरीं आल्या आहेत, पण यशोदेचा श्याम घरीं आलेला नाही. मन चिंती तें वैरी न चिंती म्हणतात ना तसं झालं आहे यशोदेचं. "काय बरं झालं असेल त्याला ? भारी हूड आहे हो–" हात घरकाम करताहेत, पण कान घेत आहेत चाहूल बाळाच्या पायांची. मन गेलं आहे कुंजवनांत कन्हैय्याला शोधायला !

१.३.७२

गोष्ट आहे संध्याकाळची. गाई घरीं आल्या आहेत. माणकांच्या वाती हिऱ्यांच्या ज्योतींनी झळकूं लागल्या आहेत. घरोघर मुलं दिव्याजवळ देवघरांत जमलीं आहेत. कानीं कुंडल मोतीहार घालून तेजोदेवता अवतरली आहे. आकाशाच्या उंबरठ्यावर दीपलक्ष्मी उभी आहे. रत्नांची ओंजळ तिनं आकाशांत आणि पृथ्वीवर लवंडून दिली आहे.

गोष्ट आहे संध्याकाळची. नर्मदेच्या काठीं एक शिवमंदिर आहे. तिथं सायंआरती चालूं आहे. घंटा वाजताहेत. घाटावरून कुणी तरी खाली पात्रांत उडी घेतो आहे. 'जय नर्मदे–जय नर्मदे !' ध्वनि निनादत आहे. पौरस्त्रिया जमल्या आहेत. द्रोणांत लावलेल्या ज्योति पाण्याच्या प्रवाहांत सोडून दिल्या जात आहेत. कांही दूर जात आहेत. कांही बुडताहेत. कांही काठावर स्थिरावत आहेत !

गोष्ट आहे एका संध्याकाळची. कुणी तरी कामावरून परतला आहे. शिणला आहे. पण तो जाणार आहे कुठं ? त्याला घर आहे कुठं ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत घर नसलं तरी चालतं, परंतु संध्याकाळीं घर लागतं. कसलंहि असलं तरी चालतं ! निवारा हवा, आसरा हवा, संरक्षण हवं आणि अत्यंत महत्त्वाचं म्हणजे दिवसाचे सारे श्रम विसरले जातील ज्यांच्या सहवासांत अशीं माणसं हवींत. नवीन उत्साह देतील, प्रेमाची भूक भागवतील अशांचा आधार हवा. कामावरून परतणारा हा जीव कुठं जाणार आहे ? धर्मशाळेंत ? पिंपळाच्या पारावर ?

गोष्ट आहे संध्याकाळची. एका खिन्न, उदास अशा तिन्हीसांजेची. आकाशांत चंद्र वर आला आहे. त्याची कोर आकाशाच्या कडेला कोपऱ्यांत कलली आहे ! ती एका बहिणीला भावाची सय करून देते आहे. अजून भाई आला नाही. बहिणीच्या निर्व्याज मनाला अस्वस्थता आली आहे. माणसं वेळेवर आलीं नाहीत घरीं म्हणजे — माणसानं वाट तरी किती पाहावी ?

गोष्ट आहे संध्याकाळची. ओटीवर आपला मुलगा कां बरं आला नाही या विचारानं कुणी वृद्ध येरझारा घालतो आहे. विष्णुसहस्रनाम पुटपुटतो आहे — पण मध्येच म्हणतो आहे, कां बरं उशीर झाला ? लवकर येईन

म्हणाला होता ? कुणी तरी डोळे लावून बसलं आहे – कुणी तरी व्याकुळ होतं आहे !

तिन्हीसांजा झाल्या आहेत. रातकिडे किरकिरत आहेत. अजून घरधनी आलेला नाही. त्याच्या पायधुण्यासाठी ऊन पाणी तयार आहे. त्याच्यासाठी केलेली हुरड्याची उसळ निवून चालली आहे. आंब्याचं रायतं व काकडीचा कायरस रसाळ झालीं आहेत, पण धनीच आला नाही. या पांदींतून गेलेली वाट तरी मेली कुठं सरळ आहे ? पाल चुकचुकते आहे आणि कुणाच्या मनांत धस्स् होतं आहे.

संध्याकाळची वेळ आहे. मोठी वाईट. घरीं यायला उगाचच उशीर झाला. आईनं सोडलंच नाही लवकर. सासुरवाशीण आपल्या लेकराला घेऊन माहेरहून सासरीं निघाली आहे. घरचा गडी सोबतीला आहे. ती देवळाशी येते आहे. डाव्या पायाची धूळ बाळाच्या कपाळाला टेकवत आहे. कुलदेवीचे आशीर्वाद मागते आहे !

गोष्ट आहे सरत्या सायंकाळची. कौसल्येचा राम घरीं आला आहे. यशोदेचा कान्हा घरीं आला आहे. आई दृष्ट काढते आहे. आल्यागेल्यांची, सग्यासोयऱ्यांची, शेजाऱ्यापाजाऱ्यांची बाळाला नजर लागायला नको. मीठ-मोहऱ्या, ओवाळून टाकल्या आहेत. भाकरी–तुकडा ओवाळून टाकला आहे.

संध्याकाळची वेळ आहे. मुलं ‘ शुभं करोति ’ बोलत आहेत. बाळाला मामाची सय येत आहे. मामाचा चिरेबंदी वाडा आठवतो आहे. मामाच्या घरच्या निंबोण्यादेखील करवंदासारख्या गोड लागल्या आहेत. तिथं चांदोबा लपला आहे, भागला आहे. तूप-रोटी खाऊनहि त्याला उपाशी उपाशी वाटलं आहे.

माजघरांत झोपाळ्यावरती अष्टीच्या मैत्रिणी बसल्या आहेत. झोपाळ्याच्या कड्या किणकिणत आहेत. त्यांचे हलके, हल्के हलके झुलताहेत. ओव्या मंजुळ स्वरांत गाइल्या जात आहेत. झोके उंच जात आहेत ! अंगणांत तुळशीवृंदावनापुढं पणती लावली आहे. तिथं आजीभोवती मुलं जमलीं आहेत. म्हणत आहेत, “ आजी, गोष्ट सांग ना – ” आजी गोष्ट सांगते आहे. मुलं हूं हूं– हुंकार देत आहेत. रंगलीं आहेत गोष्ट ऐकण्यांत !

ध्रुव-प्रल्हादांच्या गोष्टी आहेत. एका राजाच्या व दोन राण्यांच्या गोष्टी आहेत. या गोष्टी न संपणाऱ्या, न कोमेजणाऱ्या आहेत.

गोष्ट आहे अशीच एका संध्याकाळची. पाळण्यांत बाळराजे पेंगुळले आहेत. पाळण्यावर लावलेल्या चिमणाळ्याकडे पाहत मुठी चोखताहेत. थोरली वासंती पाळण्याची दोरी धरून जोजोवत्ये आहे. पापण्या जड झाल्या आहेत. निद्रादेवीच्या राज्यांतील पऱ्या स्वप्नं घेऊन डोळ्यांत उतरत आहेत! वासंती, मधु, मंजुळा मात्र झोपेनं पेंगुळलीं असलीं तरी झोपायला तयार नाहीत. हटून बसलीं आहेत. वडील आल्यावर त्यांच्याच बरोबर जेवायचं आहे. त्यांच्या पानांतला दूधभाताचा घास मंजूला गोड लागणार आहे !

गोष्ट आहे अशाच एका गोड संध्याकाळची ! थकून भागून बाप घरीं परत आला आहे. त्याच्या गळां प्रेमळ बाळहातांच्या रेशमी मिठ्या पडल्या आहेत. तो त्यांचे जावळ कुरवाळतो आहे. त्यांचे गोड गोड बोबडे बोल कौतुकानं ऐकतो आहे. त्याचे कान तृप्त होत आहेत. त्या बाळांचे तो गोड गोड पापे घेतो आहे. 'अमृत का याहून मधुर असेल ?' असं मनाला विचारतो आहे ! मुलांबाळांच्या हस्यानं घर उजळून गेलं आहे !

तुळशीला प्रदक्षिणा करून, तुळशीजवळ लावलेलं नीरांजन पदराआड करून आई घरांत आली आहे. पाळण्याकडे नजर टाकते आहे. पाळणा हलतो आहे. बाळ झोपीं गेलं आहे. आकाशांतल्या चंद्राची कोर आता कांही वेगळीच दिसते आहे. गोठ्यांत शांतता आहे. पाखरांची किलिबल थांबली आहे !

एका संध्याकाळची गोष्ट संपली आहे.

♣ ♣ ♣

क्रमांक ........................ नों दि: ..............
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
........ वि: ..................
........................ नों दि: ..............

# आणि जर भाषाच नसती !

तर फार बरं झालं असतं !

लांबलचक कंटाळवाणी व्याख्यानं ऐकावीं लागलीं नसतीं. आकाशवाणीवरची कटकट बंद झाली असती. वृत्तपत्रांच्या मतांचा गलबला ऐकावा लागला नसता ! " नाही मी बोलत, नाही मी बोलत नाथा – नाही मी – " असं एक्कावन्न वेळां घोळून घोळून तें पद बालगंधर्वांनी म्हटलं नसतं आणि रस्त्यावरच्या मवाल्यांची शिवीगाळ बंद पडली असती !

" छे ! मी असं बोललोंच नव्हतों. " असा खुलासा करण्याची मंत्र्यांना संधि मिळालीच नसती. " माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता " असं ओरडून ओरडून सांगून दुसऱ्याचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न कुणी केलाच नसता !

बोले तैसा चाले, त्याचीं पावलें वंदावीं लागलीं नसतीं. बोलाचा भात आणि बोलाची कढी करून पोट भरण्याचा प्रसंग कुणावर आला नसता !

'बोल सख्या मधु बोल' म्हणून कुणी कुणाची विनवणी केली नसती. सगळेच अबोल राहिल्यानं कुणी कुणाशी अबोला धरला नसता, कुणी रुसले नसते, कुणी कुणाशी गट्टी फू केली नसती. सारा मुक्यांचा कारभार झाला असता !

कुणी खोटं बोललं नसतं, कुणी प्रेमाच्या आणाभाका व शपथा घेतल्या नसत्या. गोड बोलून, बोलतां बोलतां कुणी एखाद्याचा गळा कापला नसता. सत्य पण अप्रिय बोलणारे वक्ते जे आज दुर्मिळ आहेत ते अजिबात शिल्लक उरले नसते !

मुखलेप केल्यानं मधुर ध्वनि करणारे औषधालाहि उरले नसते. 'ज्याची खावी पोळी, त्याची गावी ओवी' हा प्रकार बंद पडला असता. 'गर्जेल तें पडेल काय' हा अनुभव आला नसता. कारण कुणी गरजलंच नसतं ! भिंतींच्या कानांना कसलीहि कुजबूज ऐकूं आली नसती. दळायला बसून कुणाला ओवी सुचली नसती. आणि कुठं ध चा मा झाला नसता !

—आणि जर भाषाच नसती तर चकार शब्द कुणी बोलता ना. कुणाची कुणाविरुद्ध 'ब्र' काढायची हिंमत होती ना ! कुणी कुणाची 'री' ओढली नसती आणि कुणी शंका घेतली नसती बोलल्याचा 'बोलवणारा' धनी वेगळा आहे अशी ! कुणी कुणाला शाब्दिक सहानुभूति दाखविली नसती !

भाषाच नसती तर ज्ञानेशांच्या ओवीपासून राम जोशांच्या लावणीपर्यंत वाङ्मय उत्पन्न झालं नसतं. मग कुठले देव ? कुठले वेद ? सर्व कला, अखिल ज्ञान, संपूर्ण विज्ञान, सारा इतिहास व सारी संस्कृति उदयाला आली नसती—त्यांचा विकास झालेला दिसला नसता !

पण भाषाच नसती तर ? फार बरं झालं असं कधी कधी वाटतं. नाही तरी भाषा ही भलतीच फसवी आहे. भाषेचा उपयोग भावना लपवण्यासाठी, मनांतील अर्थ लावण्यासाठीच अनेकदा नाही का केला जात ? शब्द खूप असतात, बडबड खूप असते तेव्हा अर्थ फार असतो.

कशाला हवी भाषा ? बाळ रुसलं, रागावलं की ओठ काढून आईकडे कसं बघतं ? हसलं, आनंदलं की आईकडं कसं पाहतं ? त्याला का भाषा लागते ? आईच्या डोळ्यांतलं कौतुक, आईच्या ओठांवरचं अभिनंदन, आईच्या हृदयांतले आशीर्वाद बाळाला का शब्दाविना समजत नाहीत ? 'डोळ्यांत वाच माझ्या तूं गीत भावनांचें' असं एका प्रियेनं आपल्या प्रियकराला सांगितलं आहे आणि तें खरंच आहे. हृदयांतल्या या भावना समजून घ्यायच्या असल्या तर त्या शब्दांनी नाही समजतां येणार ? त्या डोळ्यांत तरळतात, नाडीच्या स्पंदनांत त्यांचा ताल ऐकूं येतो, त्या भावना जाणण्यासाठी लागणारी दृष्टि व श्रवणशक्ति ज्यांना आहे त्यांना भाषेचं महत्त्व काय ? मोठमोठ्यानं, ओक्साबोक्सी रडण्यापेक्षा मुकं रडणं अधिक भावना व्यक्त करतं !

'होम दे ब्रॉट हर वॉरिअर डेड' या कवितेंतला प्रसंग आठवतो. एका शूर सेनापतीचं शव घरीं आणलं आहे. आणि त्याची पत्नी तें पाहून स्तंभित झाली आहे. ती बोलत नाही, हुंकारीत नाही, रडत नाही, भाषेविना केवढं दुःख तिथं व्यक्त झालं आहे ! तें खोल खूप खोल रुपतं !

उत्तररामचरितांतील वासंती रामचंद्राला क्रोधानं शाप देण्यासाठी हातांत पाणी घेऊन सज्ज आहे. आणि क्षणभर थांबते. मग विचार बदलते आणि म्हणते, "अथवा अलं त्वया–" आणि ती बोलत नाही. हा तिचा राग तिनं न बोललेल्या शब्दांत अधिक जाणवतो.

कुणी आपल्यावर रागावलं तर त्याचा राग जेव्हा अबोल असतो, ती व्यक्ति आपल्याला फडाफडा बोलत नाही, रागानं केवळ मौन धरते तेव्हा ती क्रोधभावना शब्दाविनाहि अधिक जाळते– प्रियेची 'मूक' संमति हीच शृंगारांत अधिक रस भरते. वात्सल्य, कारुण्य, क्रोध अथवा शृंगार या सर्व भावना शब्दांच्या सहाय्याविनाहि उत्कृष्ट व्यक्तवितां आलेल्या आहेत.

आपल्या अनेक शब्दांची प्रचीति अगदी मर्यादित आहे. आपल्या शब्दांचं सामर्थ्य अगदी आकुंचित आहे. ऋषिमुनींचे शब्द खरे की ज्या शब्दांच्या मागून अर्थ धावतो आहे– !

आपण सामान्य माणसं. आपली भाषा म्हणजे फुकाचे मुखीं बोलण्याचा प्रकार. आपण बोलतों आहोंत इतकेच शब्द धावत आहेत. पूर्वेकडे अर्थ धावतो आहे, पश्चिमेकडे कुठं ताळमेळच नाही. जोंवर आमचे शब्दार्थ पार्वती परमेश्वराप्रमाणे एकरूप नाहीत तोंवर ही भाषा असली काय आणि नसली काय ? सारखंच !

ईश्वराचं स्वरूप या वैखरीनं समजणार आहे थोडंच ? तिथं भाषा हवी भक्तीची, आत्म्याची, चित्तशुद्धीची, एकनिष्ठेची, परा, पश्यंती, मध्यमा या भाषासुद्धा जिथं अपुऱ्या पडतात, त्यासुद्धा जेथून अप्राप्य मनसासह— कांही प्राप्त न करतां मनालाहि घेऊन परततात, जिथं मौनदेखील व्याख्यान ठरतं तिथं कशाला हवी भाषा ?

♣ ♣ ♣

# कात्री

चाकू, सुरी, कात्री, हीं लहान मुलांचीं खेळणीं नव्हत, हें मी लहानपणापासून ऐकत आलों आहें.

परंतु लहान मुलांचीं असुक खेळणीं आहेत असं मात्र याच्या उलट कांही मीं कधी ऐकलेलं नाहीं. मोठ्या माणसांचीं खेळणीं कोणतीं असा प्रश्न पडतो तेव्हा मोठीं माणसं लहान मुलांचे खेळ खेळतांना मी पाहतों. चेंडू, लगोऱ्या, पतंग मोठीं माणसंहि खेळतातच की ! मोठीं माणसं पिपाण्या वाजवतात व फुगेहि उडवतात. लहान मुलं आंधळी कोशिंबीर खेळतात, लपंडाव खेळतात, बाहुला-बाहुलीचं लग्न लावतात, त्या लग्नांत रुसतात, रागावतात, भांडतात !

तरुण-तरुणीहि प्रेमाचा लपंडाव खेळतात, आंधळी कोशिंबीर खेळतात—जरा निराळ्या अर्थानं इतकंच. एके काळीं मोठी माणसंहि आपल्या अल्पवयी

मुलां-सुलींच्या ‘ लग्नांचा खेळ ’ करीत रुसत, रागवत. भांडत – जरा निराळ्या प्रकारें ! जाऊं द्या झालं !

‘ सुरी ’ आमच्या घरांत नव्हतीच. आमच्या घरांत मी लहान होतों तेव्हा पावदेखील अभक्ष्य होता. तर मग तुमचं ‘ तें ’ कुठलं ? वडिलांच्या टेबलावर कागद-लिफाफे कापायला एक बिनधारेचं शस्त्र होतं. –चाकू, न मिटणारा. दीड इंच पातं होतं आणि चार इंच शेवटीं निमुळती होत गेलेली लाकडी मूठ होती. बहुधा सरकारी कचेरींतून तो कधी तरी घरीं आलेला होता. या चाकूला मुळीच धार नव्हती आणि लोणी कापायलाहि तो कधी उपयोगी पडला नाही. अगदी अहिंसक होता बिचारा ! मी त्याला कधीच घाबरलों नाहीं. त्याच्यापासून कुणाला अपाय होण्यासारखा नव्हता, तरी पण मला नेहमी बजावून सांगण्यांत यायचं ‘ चाकू-सुरी-कात्री हीं मुलांचीं खेळणीं नव्हत ! ’

राहतां राहिली कात्री. ती मात्र हरकामी होती. अशीच एक मध्यम आकाराची. चकचकीत आणि आकर्षक घाटाची. आजोबांनी आपल्या तरुणपणीं घेतली होती. तिचं कौतुक करतांना ते अभिमानानं सांगायचे, ‘ चाळीस वर्षं झालीं ! आता कांही असली कात्री पुन्हा कुठं मिळणार नाही. ’

सत्यनारायणाच्या प्रसादासाठी केळीच्या पानांचे हाताच्या तळव्याएवढे तुकडे करण्यासाठी हिचा उपयोग झाला आहे.

माझ्या विजारीच्या नाडीची निरगाठ जेव्हा व्हायची आणि ती सुटायची नाही, तेव्हा या कात्रीनं मला मदत केली आहे.

काकांचे कपाटांतील कामाचे कागद काकूनं याच कात्रीनं कचाकच कापले आहेत ! कांही उद्योग नाही म्हणून, बसल्या बसल्या, कानावर उगवलेले लांब लांब केस काकांनी कातरले आहेत !

“ ए गप्पा बैस, नाही तर तुझं या कात्रीनं नाक कापीन ! ” अशी धमकी द्यायला, भीति – धाक द्यायला याच कात्रीचा उपयोग दादा–अण्णांनी केलेला आहे ! !

अशा प्रकारची ही बहुगुणी कात्री, अनेक प्रसंगीं उपयोगी पडलेली आहे. जन्मल्याबरोबर अगदी पहिला संबंध कशाशीं आला असेल तर तो

कात्रीशीं. तिनंच नाळ कापली ! आणि तरीहि सगळ्यांचा राग आहे या कात्रीवर ! !

माझी आजी सांगायची, माणसानं सुईसारखं व्हावं, कात्रीसारखं होऊं नये.

सुई कशी जोडत जाते दोन वस्तु. दोन भाग सांधते, एकत्र आणते. याच्या उलट कात्री तोडत जाते. माणसानं मन जोडत जावं, मोडत जाऊं नये. गोड बोलण्यानं हृदयं जवळ येतात. उन्मत्त वागण्यानं माणसं दुरावतात. आजीचं म्हणणं एका दृष्टीनं बरोबर होतं. पण पूर्णांशानं नव्हतं !

सुई काय टोचत नाही ? दुखवत नाही ? बोचत नाही ? रक्त काढीत नाही ? आणि कात्रीचं काम काय कमी महत्त्वाचं ? कात्री काय उपकारी नाही ? फाटका-तुटका भाग, बेडौल भाग ती छाटून टाकते ! चांगलं आहे पण — अगदी सलग. पण कात्रीचा संस्कार घडल्याखेरीज का त्याचा फॅशनेबल कपडा होईल ? ते ' बेतून ' कापावं लागेल. कात्रीनं बेतलं नाही तर सुई शिवील काय ? सुई आणि कात्री यांच्या सहकार्यानं आपलं अंग झाकलं जाणार आहे, नटलं जाणार आहे ! उगाचच आपलीं कात्रीला नांवं ठेवायचीं म्हणजे काय ?

कुणी तरी कात्रीला द्विजिव्हा नागीण म्हणून निंदिलं आहे. नागिणीला दोन जिभा आहेत — कबूल. पण नागिणीचं वीष जिभेंत कुठं आहे ? दंशांत आहे. परंतु माणूस दात न लावतां दुरून दुष्ट शब्द बोलून दंश करूं शकतो. वीष पेरूं शकतो. माणसांना एकच जीभ आहे. परंतु ती नागिणी-पेक्षाहि अधिक विषारी आहे. तिच्यावरून येणाऱ्या शब्दांना तिचा विषार माखून येतो आणि कधी इतके विषमय बनतात शब्द की, नागिणीचा विषदंश कांहीच नव्हे. माणसाच्या जिभेपेक्षा, शब्दांपेक्षा कात्री खात्रीनं कमी नुकसान करणारी आहे.

लहानपणापासून कात्रीवर माझं प्रेम आहे. माझे केस न्हावी जेव्हा कात्रीनं कापी आणि तिचा चक्‌चक् आवाज होई, तिची लप्‌लप् हालचाल होई तें लहानपणीं मला मौजेचं वाटायचं ! कात्री हातांत आली की मला वाटायचं कांही तरी कापत सुटावं ! माझ्या मतानं एखाद्याला क्रियाशील बनवणारी कात्री ही एक स्फूर्तिप्रद वस्तु आहे. डॉक्टरांच्या रुग्णालयांत मी

लहान-मोठ्या, सरळ-वाकड्या चकचकीत कात्र्या पाहिल्या आहेत ! त्या मला आवडल्या आहेत. बागेंत कपौंडलगतचीं मेंदीचीं झाडं कापायला वापरली जाणारी माळ्याजवळची कात्र्यांची राणी ही मोठी कात्री मला आवडली आहे. मोठमोठ्या पुढाऱ्यांनी कसल्या कसल्या उद्‌घाटनप्रसंगीं वापरलेल्या चांदीच्या कात्र्या मला मोहक वाटल्या आहेत. शुभ कार्यासाठीहि कात्रीचा उपयोग केला गेला असं मला त्या वेळीं वाटलं आहे !

आता मी मोठा झालों आहें आणि मी कात्री शक्य तेवढ्या वेळीं वापरायची सवय लावून घेतली आहे. जेव्हा सौभाग्यवती आपल्या मागण्यांची आणि खर्चाची लांबलचक यादी माझ्यापुढं ठेवते तेव्हा मी प्रथम माझी कात्री चालवूं लागतों– " पातळ या महिन्याला नाही घेतलं तर चालणार नाही का ? " " ही वस्तु इतक्या महागाईची कशाला ? हलकी घेतली तर काय होईल ? " – " टेबल-क्लॉथवांचून माझं मुळीच अडत नाही. गाळूनच टाक तें यादींतून. " अशा अनेक प्रकारें मी तिला बचतीचं महत्त्व पटवतों आणि म्हणून, वर्षभर या कात्रीचा वापर केल्या-नंतर विम्याच्या हप्त्यासाठी अगर इतर आवश्यक खर्चासाठी मी कांही तरी शिल्लक टाकूं शकतों.

" आणि असाच एकदा पायाच्या कात्रीनं डांबरी रस्ता कापीत, बिनचेहऱ्याच्या संध्याकाळीं मी चाललों होतों " आणि " आकाशांत ढगांची गर्दी उसळली होती. त्या आकाशांतल्या शिंप्यानं विजेच्या कात्रीनं ढगांचे कपडेच कपडे करून टाकले इकडे तिकडे – "

असले उतारे वाचनांत आले म्हणजे वाटतं कात्री ही नवकथा-लेखकांनाहि प्रिय झाली आहे हें पटतं ! सगळ्यांत भयंकरपणे कात्रीचा कुणी उपयोग करीत असेल तर फिल्म सेन्सॉर करणारे. जिथं एखादा उत्कृष्ट विनोद असेल अगर नृत्यांतील सुंदर – आकर्षक हावभाव असेल, त्याच्या आगंमागं असलेला सदभिरुचीला सोडून गेलेला दृश्यभाग कापला जातो, परंतु त्यामुळं अशी विरूप ' खांडं ' पडतात – की तीं पाहून अंगावर शहारा उठतो !

संपादकीय संस्करण हें ' सेन्सॉर '-सारखंच कात्रीचं आणखी एक नांव आहे. आपल्या हातीं आलेल्या लेखांवर ' कात्री ' चालवून हे संपादक त्या

लेखांचं स्वरूप कसं बदलून टाकतात याचा अनुभव अनेकांना आला असेल ! कात्री ही मूलतः संहारक व छेदक असली तरी संपादकीय संस्करणं पाहिलीं की, कात्रीच्या उपयोगांतून मूळच्यापेक्षा कांही तरी नवीनच कृति निर्माण करणारी ही आहे हें पटायला हरकत असूं नये. खिसा कातरणारांचा उद्योग पाहिला तर हेंहि आपण कबूल कराल की, श्रीमंतांना लुटून संपत्तीची विभागणी करण्यास व पर्यायानं समाजवाद जवळ आणण्यास कात्रीच मदत करते आहे.

कात्रीचं महत्त्व किती म्हणून वर्णन करावं ! कात्री हें द्वैत असलं तर तिचं स्वरूप आणि कार्य अद्वैतरूप आहे. दोन्ही पात्यांशिवाय कात्री होणारच नाही. दोन्ही पात्यांत समीपता, सायुज्यता नसेल तर कार्य घडणारच नाही. दोन्ही डोळ्यांनी एक पाहणं, दोन्ही कानांनी एक ऐकणं, दोन्ही हातांनी एक नमस्कार करणं हें जितकं स्वाभाविक आहे तितकं स्वाभाविक आहे कात्रीचं अद्वैत !

♣ ♣ ♣

# ‘ माणूस ’ हरवला आहे--

कुठल्या तरी वर्तमानपत्रांत जाहिरात आहे, “ हरवला आहे– ” “ निघून गेला आहे– ” “ ताबडतोब निघून ये– ”

एक मुलगा हरवला आहे. नारायण. वय लहान. रंग सावळा. कपाळावर खूण. अंगांत रंगीत शर्ट. छातीवर पांढुरका डाग. त्याची आई वाट पाहत आहे. ती दुःखानं वेडी झाली आहे, व्याकुळ झाली आहे. ती त्याला क्षमा करायला तयार आहे. नारायणाला शोधून काढणाराला योग्य तें बक्षिस व वाजवी खर्च देण्याचं आश्वासन त्या वृत्तपत्रीय विज्ञापनेंत आहे.

मला वाटतं शोधावा हा नारायण. बक्षिस आहे म्हणूनच केवळ नाही. आईला मुलगा भेटवावा म्हणून. कुठं गेला असेल हा नारायण ?

मी विचार करतों. लहान आहे वयानं. जगाचा अनुभव नाही. जाणार कुठं ? आला असेल या मुंबईत. मुंबई ही सुंदर नगरी. मोठी मोहमयी आहे. इथं माणसानं सागरावर मात करून त्याला मागं हटवलं, झुलती बाग तयार केली, तुळतुळीत आरस्पानी रस्ते तयार केले ! सुंदर इमारती उठवल्या. इथं रोजगार पुष्कळ. आकर्षणं पुष्कळ. इथं विलासस्थळं हवीं तेवढीं !

इथं स्फूर्ति देणारीं स्मारकं पुष्कळ ! इथं सारं विसरायला होईल. विसरावंसं वाटेल अशाहि जागा पुष्कळ. नारायण स्फूर्ति घेण्यासाठी आला असेल. स्वतःला विसरण्यासाठी आला असेल ! गावातल्या सुखापेक्षा नवी सुखं घेण्यासाठी आला असेल— आणि इथं आल्यानंतर गाव विसरला असेल, नांव विसरला असेल, नातींगोतीं विसरला असेल—मुंबईतल्या शिवेवर. त्याचं होतं ते हरवलं असेल. तोहि हरवला असेल शेवटीं !

मला वाटलं शोधावा त्या नारायणाला. मुंबईच्या या अफाट गर्दींत तो असेल. कंगाल वस्तींत तो असेल. श्रीमंतांच्या हवेलींत एखाद्या जिन्याखालीं तो सापडेल ! चित्रपट स्टुडियोच्या दारांत तो घुटमळत असेल. त्याला रजतपटावरील एखाद्या तारकेचं ओझरतं दर्शन घ्यायचं असेल. तिच्या पदधूलीनं ‘ पवित्र ’ व्हायचं असेल. तो एखाद्या फूटपाथवर तीन पानी जुगार चालला आहे तिथं उभा असेल. कुठं तरी एक आणा टाकून पक्ष्यानं उचलून दिलेल्या पाकिटांतलं भविष्य वाचीत असेल.

किंवा वाईट कल्पना कां करा ? त्याला एखादी चांगली नोकरी लागली असेल. घर मिळालं असेल. त्याला गावाकडच्या वास्तूची गरज नाही. त्याच्या रुबाबाला ती म्हातारी दमेकरी आई आणि संधिवातामुळं अंथरुणाला खिळलेला बाप आता शोभा देणार नाहीत, असं त्याला वाटूं लागलं असेल. एखाद्या रेसमध्ये तो लखपति झाला असेल— व आता कोट्यधीश होण्यासाठी धडपडत असेल ! त्याच्याजवळ आता तोंडपुज्यांचा घोळका जमला असेल व हितोपदेश करणारे त्याला नकोसे झाले असतील !

वाटतं नारायणाला शोधावा ! कुठं भेटेल हा नारायण ? रंगानं सावळा. घनश्याम, घननीळ. श्यामसुंदर— इथं माणसं आहेत, पण तीं गोरीं आहेत.

सगळीं गोरीं आहेत. पावडर फासून गोरीं झालेलीं आहेत. अंतरंगांत मात्र काळीं आहेत. दैन्यानं करपलेलीं आहेत. दुःखानं त्यांच्यामधली माणुसकी जळून गेलेली आहे. पण सगळीं पांढऱ्या कपड्यांनी–( कफनींनी ? )–मढलेलीं आहेत. इथं कुठचा हा नारायण भेटतो मला ? ज्याचं श्यामलत्वहि मनोहर आहे असा नारायण तो मला इथं भेटायचा नाही. पण एकदा वाटतं भिन्न रूपांनी, भिन्न पोषाखांनी नटलेल्या या मानवी मायाबाजारांत नारायण असेलहि ! तोहि नटनागर त्याला वेषान्तर करावंसं वाटलं असेल ! हो, कुणी सांगावं ? पण मग या बहुरुप्यांच्या जगांत मी कसा ओळखावयाचा त्याला ?

आठवलं मला. त्याच्या छातीवर पांढरा डाग आहे आणि कपाळावर खूण आहे. पण या खुणांचा काय उपयोग आहे ? या खुणांची, भूषणांची, दूषणांची गल्लत झाली आहे इथं !

नारायणा, तूं एकाएकीं कां निघून गेलास ? नाहीसा झालास ? आपण आकस्मिकपणं एका ठिकाणांतून अदृश्य झालों आणि दुसरीकडे गेलों म्हणजे परिस्थिती बदलेल असं का वाटलं तुला ?

नारायणा, तूं हरवला आहेस आणि मी तुला शोधतों आहें. पण अशी हरवलेलीं माणसं चुटकीसरशीं सापडतात का ? एकदा वाटतं कांही लोकांना तूं हरवायला हवा असशील. तूं हरवला आहेस अशी त्यांना जाहिरात करायची असेल !

तरी पण तुला मी शोधतों. एकदा वाटतं तुझा या मुंबईत कुठं खून तर झाला नसेल ? सकारण ? अकारण ? नारायणा, तूं घरच्यांना दुखवून इकडे आलास आणि परक्यांबद्दल माया दाखवलीस म्हणून तर ही शिक्षा तुला झाली नसेल ?

नारायणा, तूं नाहीसा झालास त्याला आता आठ दिवस झाले – नाही अनेक युगं झालीं. तो वेडा सॉक्रेटीस ‘ माणूस ’ शोधीत दिवसाउजेडीं कंदील घेऊन हिंडत होता. माणसांतल्या मानवतेला जागं करण्याचा प्रयत्न अनेक साधुसंतांनी व महात्म्यांनी केला ! नारायण, तुला कुणी देवळांत शोधलं, गुहेंत शोधलं, कुणी रनांत, कुणी नराधिपांत, कुणी वनांत, कुणी मनांत. परंतु तूं अजून सापडलेला नाहीस. आम्ही शोधतोंच आहों तुला !

अजून कुणालाच नारायण भेटलेला नाही– त्याला भेटायसाठी कुणी फारसं अधीर नाही ! तो भेटायला नकोच आहे, कारण ह्या नारायण नाहीसा झाला म्हणजे कसली टोचणी राहणार नाही कुणाला !

अजून आठ-पंधरा दिवसांनी कुणी तरी माणूस हरवल्याची जाहिरात येते. मला समाधान एवढंच वाटतं की, नारायण हरवला आहे एवढी तरी जाणीव आहे कांही लोकांना. पुष्कळ झालं !

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों दि: ........................

# पत्रं नव्हे भावगीतं !

भिंतींत एक कपाट आहे. त्यांत बरींच कागदपत्रं– मुख्यतः पत्रं पडून आहेत. तें कपाट फार दिवसांपासून आवरावं असा मी बेत करतों आहें, पण मला वेळच होत नाही. आज कांही कारणानं तें कपाट मीं उघडलं आणि वरच्या कप्प्यांतील पत्रांची एक चळतच्या चळत भुरूभुरू खाली कोसळली !

संध्याकाळची वेळ असावी, आणि त्या वेळीं आमच्या घरामागं असलेल्या उंच पिंपळावरचीं पाखरं कसल्या तरी आकस्मिक आवाजानं दचकून इतस्ततः झेपावींत तसं कांही तरी झालं ! एखाद्या फुलझाडाच्या ताटव्यांतून रंगीबेरंगी खूप फुलपाखरं एकदम बाहेर पडावींत असं कांही तरी झाल्यासारखं वाटलं. जलतरंगाच्या सर्व काचपात्रांना स्पर्शून झरकन् एक स्वरनाद किणकिणत उठावा असा भास झाला. आकाशांत सरसर गेलेला

बाण अधांतरीं फुटावा आणि त्यांतून तऱ्हेतऱ्हेचीं रंगीत अग्निपुष्पं बाहेर पडावींत असं कांही दृश्य वाटलं.

माझ्या पायाशीं पत्रांचा चौफेर सडा पडला होता. विविध रसरंगांनी भरलेलीं होतीं तीं. एक आईचं पत्र होतं. माझी आई दूर आहे कोकणांत. तीं जराशी साक्षर आहे इतकंच. क्वचितच ती लिहिते. परंतु मला परीक्षेंत गतवर्षीं जें यश मिळालं त्या वेळीं तिनं लिहिलं आहे तें. त्या पत्रांत आहेत दोनच ओळी आणि दहा-बारा शब्दच. परंतु त्यांतील वात्सल्य, कौतुक, अभिमान सारं अथांग आहे ! माझ्या आईच्या मनाचं मोठेपण सारं या दोन ओळींत— या छोट्या भावगीतांत मी समजू शकलों आहें ! ती एकच ओवी आहे—अमृताच्या अक्षरांनी लिहिलेली.

हें कुठलं बरं दुसरं पत्र ? आहे एका अनामिकेचं. माझ्या एका वाङ्मय-कृतीचं मनमोकळेपणं अभिनंदन करणाऱ्या रसिकेचं. पत्राच्या आरंभीं माझ्या नांवामागं ' प्रिय ' लिहायला तिला संकोच वाटला आहे— पत्राच्या शेवटीं तिला ' आपली ' लिहायला कसंसं वाटलं आहे. प्रिय शब्द कापत आला आला— आपली बद्दल 'आ' काढून पूज्य लिहिलं आहे. खरं पाहिलं तर 'प्रिय' आणि 'आपली' हे नुसते उपचाराचे शब्द झाले आहेत. त्यांना म्हटलं तर अर्थ आहे म्हटलं तर अर्थ नाही ! तरी पण पुष्कळदा हे शब्द लिहितांना बिचकायला झालं आहे. या अनामिकेचा अन् माझा परिचय नसला तरी— ध्यानीं मनीं नसतांना एकाएकीं आपल्या कानावर, रस्त्यांतून सारंगी वाजवीत जाणाऱ्या सारंगीवाल्यानं छेडलेले ' ललत 'चे सूर यावेत असं या पत्राच्या दर्शनानं झालं !

हें एक आन्तर्देशीय पत्र. माझ्या आजारीपणांत आलेलं. सात-आठ-महिन्यांपूर्वी बोट कापलं आणि सेप्टिक् झालं. तेव्हा मी एकटाच होतों. पत्नी माहेरीं गेली होती बाळंतपणासाठी. माझ्या बहिणीला कळलं मी आजारी होतों हें. तिनं लिहिलन् " मी येतें आहें रे भाऊ— काळजी करूं नकोस. ही निघालेंच— " तिचं माझ्यावर प्रेम आहे. निर्व्याज ! निष्कपट ! प्रत्यक्ष स्नेहमूर्ति आहे ती. एरवी ती मला कधीच पत्र लिहीत नाही. भाऊबीजेचं सुद्धा पत्रानं बोलावणं करीत नाही. परंतु त्या बोटभर पत्रचिंधीनं मी

बांधला गेलों आहें. त्या गोड भावगीताचे सूर मला सारखे तिच्याकडे ओढीत असतात !

या ढिगांत मित्रांचीं, शाळूसोबत्यांचीं कांही पत्रं आहेत. त्यांतून शालेय जीवनांतील आठवणींची उजळणी झालेली आहे. तीं स्मृतिगीतं आहेत. आव्हानगीतं आहेत. आवाहन गीतं आहेत. दूर गेलेल्या मित्रांनी लिहिलेलीं पत्रं आहेत. विरहगीतं आहेत. गैरसमजामुळं अलग पडलेल्या ज्या मित्रांच्या मनांतील संशय कालांतरानं दूर झाला आहे, अशा मित्रांचीं एक-दोन पत्रं आहेत. सुनीतासारखीं वाटतात. शेवटीं गोड कलाटणी असलेल्या भावगीतां-सारखीं वाटतात !

आणखी एक पत्र आहे ! माझ्या पत्नीनं लिहिलेलं. मला पहिली मुलगी झाली तेव्हा मीरा माहेरीं होती. चार महिने तिकडेच राहिली. त्यांतच दुर्दैवानं माझी मुलगी देवाघरीं गेली. मीं मीराला केवढं तरी वाङ्मयीन, मोठं पत्र लिहिलं होतं व माझं दुःख वर्णिलं होतं – ! पण मीरानं त्याला छोटंसं उत्तर पाठवलेलं आहे. दोन ओळींत तिनं माझंच सांत्वन केलं आहे. कांही मोठं तत्त्वज्ञान नाही, पण स्वतःचं दुःख गिळून उलट माझ्या मनाला तिनं धीर दिला होता ! ते पत्र मला सुखवतं – जुनी आठवण करून दुखवतंहि. पण– तें पत्र वाचायला हातांत घेतलं की, वाटलं आपण मीराचा हात हातांत घेऊन सागराच्या पुलीनावर पडलों आहोंत – आणि मीरा दुसऱ्या हातानं आपल्याला थोपटीत एक संध्यागीत म्हणते आहे– झोपवीत आहे !

आणि हें पत्र कुणाचं आहे कुणास ठाऊक ? त्याचा पहिला व शेवटचा भाग फाटून गेला आहे. पण त्यांतील आर्जवी भाषा, मधुर भावना मनाला मोहवणारी आहे. ज्यांच्याबरोबर मी कुठं तरी लांबची सहल केली त्यांच्या पैकी कुणाचं तरी असावं. सुंदर वर्णनं आहेत प्रवासाचीं ! निसर्गाचीं ! हें पत्र कुणाचं असेल ? मीरेशिवाय आणखी दोघीतिघी बरोबर होत्या. पत्रांतील अक्षर ओळखीचं नाही. हें पत्र मीरेला लिहिलं आहे की मला तेंहि सांगतां येत नाही.

पण म्हणून काय झालं. एखाद्या ठुमरींतल्या कांही शब्दांचा पत्ता लागला नाही अगर कांहींचा अर्थ समजला नाही अगर ती कुणी म्हटली आहे

तिचं नांव कळलं नाही म्हणून का ठुमरींतलं खरं सौंदर्य समजत नाही, असं थोडंच आहे ?

अशीं पण कांही पत्रं आहेत या ढिगाऱ्यांत. कांहीकांहींचे संदर्भ मी विसरलों आहें, पण त्यांचा स्पर्श झाला, त्यांचीं अक्षरं वाचलीं की, एखादं चाल विसरलेलं गाणं जसं नकळत चालीसकट स्फुरतं तसं होतं. आपलं बोट न कळत पियानोवर पडावं आणि मग अकल्पित पण सुमधुर स्वर-निनाद कानीं यावा तसं होतं.

मी पत्रं तशींच उगाच उलट-सुलट करून कपाटांतल्या वरच्या खणांत पुन्हा रचून ठेवतों. तीं उलट-सुलट करतांना जणू कांही मी भिन्न भिन्न रागांच्या स्वरांचं आरोहावरोह अनुभवतों. नाना रंगांचं इंद्रधनुष्य न्याहाळतों. नाना गंधांच्या फुलांत. मी स्वतःला कुठं तरी हरवून जातों.

♣ ♣ ♣

# शुक्रवार

लहानपणी सर्व वारांत मला शुक्रवार आवडायचा आणि आजहि तो तसाच माझा आवडता वार राहिला आहे.

पण लहानपणीं मला शुक्रवार आवडायचा त्याचीं कारणं निराळीं होतीं. आमच्या पुण्यांत शुक्रवार बालाजीचा वार म्हणून प्रसिद्ध असायचा. शुक्रवारीं आम्ही काबली खात असूं. मोठी चविष्ट. जरा तिखट. त्यावर हिरव्या मिरच्यांची चटणी आणि शिवाय वर लिंबाची धार पिळलेली असायची. अजून त्या पदार्थांची चव माझ्या जिभेवर रेंगाळते आहे.

चैत्रांतल्या शुक्रवारीं, श्रावणांतल्या शुक्रवारीं, नवरात्रांतल्या शुक्रवारीं नटून सजून, जोगेश्वरीच्या देवळाकडे निघालेला सुवासिनींचा मेळावा आठवतो. बुधवारांतल्या रस्त्यांनी त्यांची ही गर्दी असायची आणि मंजुळ गोंगाट चालायचा ! मोगरीच्या, चमेलीच्या, सायलींच्या वेण्या-गजऱ्यांचा

सुगंध दरवळून राहायचा–! श्रावणांतले शुक्रवार मला अजून आठवतात. आई जिवतीची पूजा करायची. आम्हां मुलांना ओवाळायची. आमच्यासाठी देवाजवळ आयुरारोग्य मागायची. आमचीं भावंडं जीं दूर असत त्यांच्यासाठी पण म्हणायची, ‘ जिथं जाझं बाळ असेल तिथं सुखी राहूं दे. ’ शुक्रवार मला मातृवात्सल्यानं भारलेला वाटतो.

आज शुक्रवार मला आवडतो तो वेगळ्या कारणांनी ! सोमवार म्हणजे नव्या उत्साहाने साप्ताहिक कामाला प्रारंभ करण्याचा दिवस. पण हा सोमवार जरा बेभरवशी वाटतो. कधी त्या सोमवारीं नवा उत्साह वाटेल तर झाला पुन्हा आठवडा सुरू. झालं ते कामाचं रहाटगाडगं सुरू, अशी पण भावना असते. दीर्घ सुटीनंतर शाळा सोमवारीं सुरू व्हायची तेव्हा असाच कंटाळा आलेला असतो – किंवा भलताच उत्साह असतो. अशा सोमवारला इंग्रजींत ‘ ब्लॅक मन्डे ’ म्हणतात तें का उगीच ? सोमवारीं त्याच त्याच सुरू होणाऱ्या कंटाळवाण्या कामाचं विलक्षण ओझं येऊन पडलेलं असतं मनावर. सोमवारीं कचेरींत फारसा उत्साह नसतो. कचेरींतल्या कामांतून सुटका मिळावी अशी धडपड असते. सोमवारीं रजा घेतली अगर सुटी मिळाली, तर हवी असते. म्हणजे चांगली अडीच दिवस सुटी लाभते. सोमवारीं ऑफिसमधल्या अधिकाऱ्यांची नजर आणि देखरेख शंकराच्या तृतीय नेत्राची आठवण करून देणारी असते.

सूर्य उगवतांना त्याच्याकडे पाहतां येतं परंतु तो जसजसा वर चढतो तसंतसं त्याच्याकडे पाहणं कठिण जातं. ऑफिसमधल्या साहेबाचं तसंच असतं. सोमवार-मंगळवार जरा कडक असतं, ताठर असतं त्यांचं धोरण. जसाजसा आठवडा संपत येतो तसतसा साहेबदेखील मृदुमृदुल होत जातो ! आणि मग शुक्रवार येतो.

मी शुक्रवारीं खुषींत असतों.

“ आता काय आजचा एकच दिवस कामाचा. उद्या काय शनिवार ! अर्धाच दिवस. मग लगेच रविवार. ” हे विचार मोठे सुखकर असतात. तात्यासाहेब केळकरांनी एकदा दिलेली टाइपरायटरवरील घंटेची उपमा आठवते. किती मंजुळ व नादमधुर असते. त्या मंजुळ ध्वनींत एक सूचकता

असते. टाइप करायला घेतलेली ओळ संपत आलेली आहे. आता फार तर एक-दोन शब्द मावतील इतकेच !

शुक्रवार म्हणजे अगदी तसाच नाद, तसाच तरंग उसटून जातो. मंगळ, बुध, गुरु, शनि या सर्वांपेक्षा शुक्राचं तेज मला अधिक मोहिनी घालतं. शुक्रवार म्हणजे सुरम्य शिथिलतेला ( रिलॅक्सेशन ) आवाहन. शुक्रवार म्हणजे सुटकेचा मंद वाऱ्याची झुळुक ! शुक्रवार म्हणजे पहाटच्या शुक्राच्या चांदणीची रजतप्रभा ! शुक्रवार म्हणजे पहाटेपूर्वीचं आशादायक अर्धगुलाबी धूसर वातावरण !

शुक्रवार म्हणजे एक सुमधुर आश्वासन आहे. आगामी शनिवार-रविवारच्या बेताचं स्वप्नरंजन आहे. रविवार हा सुटीचा दिवस आता येणार ही अपेक्षा. त्या दिवसाची चाहूल शुक्रवारीच लागलेली आहे. माहेरी गेलेली नवपरिणीत अर्धांगी आता परवा येणार या कल्पनेत जें सुख आहे, तें जसं हृदयाला आधीपासून वेध लावतं, हुरहूर लावतं तस या शुक्रवारचं आहे. प्रत्यक्ष रविवार येतो— आणि सुटी, स्वातंत्र्य, विश्रांति, या शब्दांचा धुराळा उडवीत जातोहि. एखादा रविवार इतर वारांपेक्षा अधिक कामांचा साचलेल्या कामांचा फडशा पाडायला भाग पाडणारा, व अत्यंत निराशा करणारा ठरतो ! पण शुक्रवार मात्र कधी निराशा करीत नाही. कारण त्याचं सुख केवळ स्वप्नप्रान्तांत असतं व नेहमी तें तसंच राहतं !

कुणी म्हणतात, शुक्रवारीं केलेले बेत यशस्वी होत नाहीत. पण मला तें नेहमी पथ्यावर पडल्यासारखं वाटतं. त्यामुळं मी एक तर बेत करीतच नाहीं आणि केले तर असे गंमतीदार करतों की, ते यशस्वी होणार नाहीत याबद्दल माझी खात्री असते !

सोमवारपासून गुरुवारपर्यंत केलेल्या कामाचा शीण विसरायला लागायचं, तो ताण शिथिल करायला प्रारंभ करायचा एवढाच उद्योग असतो माझ्या मनाला शुक्रवारीं. खूप चालावं खूप चालावं आणि खूप थकावं. आणि मग मुक्कामाची जागा दिसूं लागावी, लहान मुलाला आपलं घर दिसूं लागावं म्हणजे जसा विलक्षण आनंद होतो. दिलासा मिळतो तसं मला होतं.

घर आलं. घरीं गेल्यावर आता विश्रांतीच आहे, पण त्या विश्रब्धतेच्या भावनेची पहिली झलक शुक्रवारींच अनुभवाला मिळते. परीक्षेच्या वेळीं पाच-सहा प्रश्नपत्रिका झाल्या आहेत, आणि आता काय एकच पेपर उरला या जाणिवेंत जसा मोकळेपणा वाटतो तसा मोकळेपणा मला दर शुक्रवारीं लाभतो ! शुक्रवारीं खूप बेत करणं, ते बरेचसे मोडण्यासाठी करणं, ते मोडणार हे ठाऊक असूनहि रचणं, हाहि एक छंद आहे माझ्या मनाला. कारण त्यामुळं माझं मन आठवड्याचा शीण विसरत असतं !

म्हणून शुक्रवारीं संध्याकाळीं मन प्रसन्न असतं !

♣ ♣ ♣

# अंधार

**फार** भीति वाटे मला लहानपणीं अंधाराची. आमच्या जुन्या वाड्यांत माजघरांत खूप अंधार असे. त्या अंधारांतून पलीकडे जायचं म्हणजे मोठा प्रसंगच असे. ओटीवरून, माजघरांतून मग स्वयंपाकघरांत जावं लागे. मला ठाऊक असे की, या अंधाऱ्या माजघरांतून मला प्रकाशमय स्वयंपाकघरांत जायचं आहे, तिथं माझी आई आहे, मावशी पण आहे, परंतु त्या अंधारांतून जातांना मी जीव मुठींत धरून जायचा.

माझी मावशी मला अनेक गोष्टी सांगे. त्यांत बालध्रुवानं अंधाऱ्या जंगलांत प्रवेश केला, तिथं त्याला वाघ-सिंह भेटले ही गोष्ट ती सांगूं लागली की, मी घाबरून जाई. जंगल आणि तो किर्र्र अंधार, त्या गुहा, तीं अंधारी भुयारं यांचीं वर्णनं हीं मी हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून वाचलीं

आहेत, पण वाचतांना मी कंदिलाची वात मोठी केलेली आहे, दिव्याच्या अधिक जवळ सरकलों आहें, कपाळावरचा घाम टिपला आहे.

अंधारांत मला कधी झोप आली नाही. बारिकसा दिवा रात्रभर ठेवायचा मी नेहमी आग्रह धरलेला आहे. आई म्हणायची, ' अरे, झोप लागली एकदा की, मग अंधार काय आणि उजेड काय ? ' पण मला त्या वेळीं वाटायचं डोळे उघडे ठेवून उजेडांत झोपतां आलं तर काय बहार होईल ! पण अजून तो शोध लागलेला नाही.

अंधार हा मला अनैसर्गीक आणि अस्वाभाविक वाटतो. परमेश्वरानं बारा आदित्य निर्माण केले. एक दोन नाही असंख्य सूर्य निर्माण केले. प्रत्येक ग्रहाभोवती चंद्र निर्माण केले — अनेक तारका निर्माण केल्या. प्रत्येक वस्तूला प्रकाशकिरण परावर्तित करण्याची शक्ति दिली. परमेश्वर म्हणाला ' प्रकाश असू दे ' आणि सर्वत्र प्रकाश आला !

अंधार,... अंधार कां आणि कुणी केला ? अंधाराला नष्ट करण्यासाठी देवानं अनंत कोटी प्रकाशगोल केले, पण तरीहि अंधार आलाच ! सूर्य मावळत होता आणि चंद्र उगवत होता त्या वेळीं त्यानं संधि साधलीन्. त्यानं कधी चंद्राची मदत घेतली, कधी पृथ्वीची घेतली. चंद्राला मध्ये घालून त्यानं सूर्याचा प्रकाश पृथ्वीला पोहोचूं दिला नाही. कधी पृथ्वीच्या पाठीशी राहून चंद्रावर त्यानं स्वामित्व गाजवलं. अनंत अवकाशांतील सूर्यासूर्यांत जी जागा होती ती त्यानं अडवली. या अंधाराच्या कारवाया वर्णाव्या तरी किती ! उगवत्या सूर्याला त्यानं लांबलचक — अगदी दीर्घ साष्टांग नमस्कार घातला तर ऐन मध्यावर जेव्हा सूर्यराज आले तेव्हा तो वस्तुमात्राच्या पायाशी लपून राहिला... ! अंधार असा विचित्र आहे. प्रकाशांत तो नसतो, पण जिथं प्रकाश असतो तिथं अंधारदेखील असतो.

या अंधारानं एकदा मला ग्रासलं. वडिलांच्या मृत्यूमुळं मी एकाकी झालों. त्याच वेळीं मी इंटरची परीक्षा नापास झालों. माझ्या महत्त्वाकांक्षेचा चक्काचूर झाला. मला नोकरीला जुंपून घ्यावं लागणार होतं. वडिलांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम दि:

कर्जाचा बोजा उचलावा लागणार होता. ज्या मुलीवर मीं प्रेम केलं तिच्याशीं माझं लग्न होणं आता शक्य नव्हतं. त्या वेळीं भर दुपारीं मला अंधार जाणवला. त्या अंधारांत माझ्याजवळ माझी आई होती. शांतपणे जळणारी समईतील ज्योत. तिच्या प्रकाशानं मला वांचवलं.

अंधार मला आवडायचा नाही, कारण अंधार म्हणजे चोऱ्या व गुन्हे करण्यासाठी सैतानानं विणलेलं आच्छादन. अंधार म्हणजे हिंस्र पशूंना आपली असमर्थनीय हिंसा चालू ठेवण्याचा परवाना. अंधार म्हणजे दुःख, निराशा, अज्ञान.

एका रात्रीं मी असाच जागा झालों. उशागती ठेवलेला दिवा तेल संपल्या-मुळं विझून गेला होता. आणि खोलींत अंधार पसरला होता. मी घाबरलों. डोक्यावरून पांघरूण घेतलं. पण त्यामुळं अंधार नाहीसा कसा होणार ? तो अधिकच वाढला. अखेर थोडं धारिष्ट केलं. मी उठलों आणि अंधाराकडे पाहूं लागलों. हो, अंधार पाहूं लागलों.

खोलींतल्या खिडकींतून बाहेर पाहिलं. आकाश ढगांनी व्यापलं होतं. त्यामुळं अंधार तीव्रतर झाला होता. पण तसाच पाहत राहिलों. थोड्या वेळानं ढग पांगेल. अंधाराला छिद्रं पडलीं. लक्षावधि तारका वर चमकत होत्या. पावसाळ्याचे दिवस होते. मीं खिडकींतून खाली पाहिलं. या झाडा-वरून त्या झाडावर काजवे उडत होते. खूप दूरवर पाहिलं. आगगाडीच्या मार्गावरचे सिग्नल माझ्या खिडकींतून दिसतात. अनेक लाल व एखादा हिरवा असे दिवे पाहिले. दूरवर कांही चाळी होत्या. त्या चाळींतल्या कांही मजल्यांवरच्या कांही खिडक्यांच्या प्रकाशित चौकटी दिसत होत्या ! आकाशांतून एक विमान गेलं त्याच्या दोन पंखांवरचे दोन हिरवे तांबडे दिवे उघडझाप करीत संथपणे सरकले !

मनासमोर नर्मदातीर उभं राहिलं व त्या पात्रांत पुढंमागं हेलकावणारे दीप दिसूं लागले. प्रजासत्ताक दिनीं प्रकाशदीपमालांनी नटलेलं बोरीबंदर आठवलं—आश्विनी अमावास्येला प्रकाशकिरणं उधळीत येणारी दीपावलि कशी नाचत, गात येते याचं स्मरण झालं—अंधाराविना दीपावलीला तरी काय महत्त्व ? मीं त्या तंद्रींतून वर आकाशाकडे पाहिलं. ढग दूर गेले होते.

चंद्रमा बाहेर आला होता, पण त्या प्रकाशित चंद्रावरहि गालबोट होतं अंधाराचं आणि किती छान दिसत होतं तें !

आता माझी अंधाराची भीति कमी झाली आहे. आता कुतूहल वाटूं लागलं आहे. भूतकाळ एक अंधार आहे आणि भविष्यकाळ दुसरा अंधार आहे ! भूतकाळांत डोकावून भविष्यकाळाचा अंदाज बांधणारे पुष्कळ आहेत. एकाच्या अभ्यासांतून इतिहास जन्मला आहे. दुसऱ्याच्या अभ्यासांतून तत्त्वज्ञान ! व्यक्तमध्य प्रकाशित जीवनापेक्षा आदिअन्ताच्या दरवाजामागं जो अंधार आहे तो आकर्षून घेतो आहे माझं मन.

सत्य आणि परमेश्वर दोघं अंधारांत गुरफटलेलीं आहेत म्हणून बरं आहे. प्रखर तेजस्वी सत्य आपल्याला पाहवणार आहे काय ? कोटी रवीहून आगळं असणारं, किंवा गीतेंत वर्णन केलेलं विश्वरूप परमेश्वरी दर्शन आपल्याला या डोळ्यांनी घेता येईल ? छे ! आपल्याला हवं तें ब्रह्म शबल हवं आहे. आपल्याला ईश्वर पहायचा आहे तो सावळा, घननीळ, नील-लोचन !

आता मला अंधाराची भीति वाटत नाही. लहानपणीं ऐकलेल्या भक्त ध्रुवाच्या गोष्टींतल्या जंगलांत मी मनानं ध्रुवाबरोबर जातों. आता अंधारांत चमकणारे ते वाघाचे, सिंहाचे डोळे दिसतात – परवा मोटारीनं घाटांतून येतांना – अंधारांतून येतांना मोटारीच्या दिव्यांच्या प्रकाशांतून पुढं आलेल्या बैलगाडीला जुंपलेल्या बैलांचे डोळे नीलमण्यासारखे चमकलेले मी पाहिले. मी कल्पना केली वाघाचे डोळे असेच चमकत असतील. मी अंधारांत जंगलांत कधी गेलोंच नाही. खोटं कशाला बोलूं ? पण मनानं मी हरिभाऊंच्या नायकांबरोबर भुयारांत शूरपणे उतरतों. इंद्रभवन गुहेंत जातों. कपालकुंडलाच्या व कापालिकांच्या कळपांत अमावास्येच्या रात्रीं स्मशानांतरीं रमतों !

अंधारांतला शब्दवेधहि मला आता साधला आहे. तारकांचं गाणं मी अमावास्येच्या रात्रीं ऐकलं आहे. चांदणं नसल्यामुळं चकोरानं केलेला आक्रोश माझ्या मनापर्यंत पोहोचला आहे. रातकिड्यांच्या किरकिरण्यांतला व बेडकांच्या डरावण्यांतला जीवनाचा आक्रोश मला जाणवला आहे.

कमळाच्या पानाआड राहून विरहव्याकुल झालेल्या चक्रवाकांच्या विराहिण्या मी ऐकल्या आहेत.

लहानपणीं मला निजतांना खोलींत प्रकाश लागे. आईचा हात माझ्या अंगावर असावा असं वाटे. कसली तरी अकारण भीति माझ्या मनावर होती. आता आई अंधाराआड गेली आहे. पण त्या अंधारांतहि आईचं मला दर्शन होतं — तेजस्वी ताऱ्याप्रमाणं. आईचा स्पर्श मला जाणवतो, अंधाराची चौघडी मी पांघरतों तेव्हा !

♣ ♣ ♣

# म्हणे वेळ वांचवा

वीणाताईंना भरपूर वेळ आहे. या वेळाचं काय करायचं हा त्यांच्यापुढं एक प्रश्न आहे. रिकामपणीं काय करावं हें त्यांना सुचत नाही. त्या गाण्याच्या क्लासला जातात. सरलाबाई, सुनंदा, ललिता या कागदी फुलांच्या वर्गाला जातात. सगळ्यांना भरपूर वेळ आहे.

निशा आणि मकरंद यांचा दोघांचा छोटा संसार आहे. मकरंद अकराला जातो कचेरींत. कचेरी गावांतच आहे. सकाळीं ७ ला उठलं तरी आणि अगदी सावकाशीनं कामं केलीं तरी १० वाजेपर्यंत मकरंदचं पान वाढायला हरकत नाही. मकरंद तसा कांही मोठा चोखंदळ व चवचाल जिभेचा नाही. साधा आणि रुचकर स्वयंपाक असला म्हणजे चालतं त्याला. परंतु निशाताईंनी नुकताच 'बरशेन' घेतला

आहे आणि प्रेशर कुकर ! त्यामुळं त्या ऐटींत सांगत असतात, " माझे बाई दोन तास वांचतात. "

बाजारांतून निवडलेलं धान्य आणून निवडण्याचा वेळ वांचवायचा. संध्याकाळीं बाजारांतून आयतं कांही आणून खायचं आणि स्वयंपाकाचा वेळ वांचवायचा. फास्ट लोकलनं घरीं यायचं, कारण प्रवासांतला वेळ वांचवायचा. इलेक्ट्रिक रेझरनं दाढी करायला दोन मिनिटं लागतात व त्यामुळं दाढीच्या कार्यक्रमांतील दोन मिनिटं वांचतात, तीं वांचवायचीं !

पण या वांचलेल्या वेळाचं करायचं काय ? कुमुद चामड्याच्या आणि शिंपांच्या वस्तू करते या रिकामपणीं. पण त्यांचा उपयोग काय ? किती करायच्या आणि दोन खोल्यांच्या बिऱ्हाडांत त्या ठेवायच्या तरी कुठं ?

मधुकररावांना मोठ्या कादंबऱ्या वाचायला वेळ होत नाही. त्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या वाचाव्या लागतात. चांगलीं उत्तर-रात्रीपर्यंत रंगणारीं दीर्घ संगीत नाटकं पाहायला कुणाला वेळच नाही. त्या नाटकाच्या तीन ताशी रंगावृत्त्या पहाव्या लागत आहेत ! वर्षांतून एखादा होणाऱ्या सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेला जायला वेळच नाही ! एकीकडे लोक एक-सारखा वेळ वांचवत आहेत आणि एकीकडे म्हणत आहेत, " काय करावं, वेळच मिळत नाही— " यांतील विसंगति विचित्र नाही वाटत ?

एका चेंडूच्या मागं अकरा लोक चार-पांच दिवस धावत आहेत आणि हजारो नाही लाखो लोक आपले तासन् तास त्यांचा खेळ पाहत बसले आहेत. यांचा वेळ कसा गेला ? त्यांना वेळ आहे यासाठी. ही मॅच जगाच्या पाठीवर कुठं तरी चालली आहे. आणि दर पांच मिनिटांनी ऑफिसमधलं काम सोडून महेश श्रीधरला विचारतो आहे, " काय रे, स्मिथच्या किती झाल्या ? हॉल उडाला का ? " कारण श्रीधर कँटीनमध्ये पॉकेट ट्रॅन्झिस्टर घेऊन बसला आहे. अनेकांचा वेळ जातो आहे या फालतू गोष्टींत. अनेक मंडळी वेळ वांचवत आहेत आणि कुठं तरी कसा तरी खर्च करीत आहेत.

कुठली तरी नटी कुठल्या तरी चित्रपटाच्या उद्घाटनाला जाणार आहे. तिच्या वाटेवर, चित्रपटगृहाभोवती हजारो स्त्री-पुरुष तिला पाहण्यासाठीं

तासन् तास उभे आहेत. त्यांचा वेळ जातो आहे ! पण त्यांना विचारा, “ जरा माझं एवढं काम करतां ? ” म्हणतील, “ वेळ नाही ! ”

चपलादेवी नाटकांत काम करतात. त्यांच्या नाटकाच्या तालमी होतात एका हॉलमध्ये. तालीम होते दहा मिनिटं. येण्या-जाण्यांत वेळ जातो दोन तास. डायरेक्टर येतच नाही. गप्पा होतात दोन तास. कुणी तरी उशीरा येतं आणि सारा वेळ जातो फुकट !

एखादी सभा आहे कार्यकारी मंडळाची. सभेंत काम आहे मामुली. प्रामाणिकपणे एकोप्यानं केलं तर तीन मिनिटांत उरकेल असं. परंतु गणसंख्या होण्यासाठी अर्धा तास जातो, चहाचिवड्यांत अर्धा तास जातो. पॉइंट ऑफ ऑर्डर, तहकुबीच्या सूचना आणि शाब्दिक छल काढण्यांत एक-दीड तास जातो—क्षुद्र मुद्दयावरहि “ मला बोलायचं आहे ” असं सांगून तेंच तेंच बोलण्यांत कुणी तरी पंचवीस मिनिटं खातो—

एकीकडे नव्या नव्या सुधारणांनी वेळ वांचवतों आहों. टंकलेखनानं, लघुलेखनानं लेखनासाठी लागणारा वेळ वांचवला. स्वयंपाकांत खर्च होणारा वेळ वांचला. ‘ डायजेस्ट ’ निघाल्यामुळं वाचनांतला वेळ वांचला, जलद गतीचीं वाहनं उपलब्ध झाल्यामुळं प्रवासातला वेळ वांचला — पण मी म्हणतों या वांचलेल्या वेळाचं आम्हीं केलं काय ? आणि कांही केलं नसेल आणि तो भलत्या गोष्टींत आम्ही खर्च केला असेल, तर तो आम्ही वांचवला तरी कशाला ?

पण नव्या यंत्रांबरोबर जीवनाची लय एकसारखी वाढत चालली आहे. ज्यांत त्यांत विद्युत्-वेग हवासा वाटूं लागला आहे. चित्रपटांत नाही आपण पाहत ? “ टेंपो ” फास्ट हवा आहे. गाण्याच्या चाली धावत्या हव्या आहेत, नृत्यं वेगवतीं हवीं आहेत. यांत्रिक उत्पादन आणि दळणवळण वेगानं व्हायला हवं आहे. दूरच्या देशांतली बातमी ताबडतोब सचित्र आम्हांला समजायला हवी आहे !

आपण वेगाच्या आहारीं जातों आहों आणि वेळ वांचवतों आहों आणि या वांचवलेल्या वेळाचं आपण काय करतों आहों ? कांही लोक जनरल नॉलेज — सामान्यज्ञान वाढवीत आहेत. रॉकेटचं टोपण कसं असतं, पांचव्या

टेस्टमध्ये कुणी सेंचरी काढली, कोठल्या चित्रपटांत साधनादेवी आणि दिलीपकुमार यांनी प्रथम कामं केलीं, कुठल्या नटीनं कितव्यांदा घटस्फोट घेतला — ही माहिती चविष्टपणानं आम्ही मिळवतों. वेळ मिळाला रे मिळाला की तो रमींत आम्ही पैशांसह घालवतों. कांही लोकांना वेळ मिळत नाही आणि कांही लोकांना मिळाला तर तो कुठं तरी उधळल्याशिवाय चैन पडत नाही.

मला वाटतं आपण आपल्या जीवनाची लय उगाच बदलूं नये. मला वाटतं वेळ मिळालाच तर त्याचा उपयोग सामान्यज्ञान मिळवणं, कुठली तरी कला संपादणं, कांही तरी अर्थोत्पादन करणं, कसला तरी खेळ खेळणं यांत खर्च करूं नये, त्यापेक्षा आपण या वेळांत स्वस्थ कां बसू नये ? थोडं अंतर्मुख कां होऊं नये ?

♣ ♣ ♣

# दार उघड —

अरे दार लावून काय बसतोस? मी तीनतीनदा तुझ्या दरवाजावर ठोठावतों आहें आणि तूं साधी ओ पण देत नाहीस? एवढ्या कोणत्या कामांत आहेस? कसला पसारा मांडून ठेवला आहेस की काय? का माझ्यापासून तुला कांही लपवायचं आहे? तुझ्या हातांतलं सगळं काम झालं म्हणजे चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणून नाटकी अभिनय करून माझं स्वागत करीत तूं दार उघडणार आहेस? पण छे! तें मला नको आहे.

तुझ्यासाठी मी कांही तरी घेऊन आलों आहें. तें कदाचित् तुला आवडेल, कदाचित् आवडणार नाही. मला ठाऊक नाही तुझं मन. तुझ्याच काय, पण कुणाच्याच मनाचा पत्ता लागत नाही. एकाला जें एक आवडतं तें दुसऱ्याला वीष वाटतं. एकाच्या दारीं मी पुत्रजन्माची वार्ता घेऊन

गेलों. त्याला ती सुखाची वाटली. दुसऱ्या घरीं त्या वार्तेनं पित्यालाहि दुःख झालं. अशीं तुम्ही चमत्कारिक आहां. तुमचा भरंवसा नाही.

अरे, सूर्य सहस्रकरांनी सोनं उधळतो आहे. चंद्र शीतल दुग्धामृताचे हंडे ओततो आहे. वारा कस्तुरीचा सुगंध लुटत चालला आहे. मेघराज जलमौक्तिकांच्या सरी शिंपीत चालले आहेत आणि तूं दार लावून काय बसला आहेस एकटा ?

हं, बरोबर. या निसर्गांतले राजे-महाराजे तुझ्या दारावरून मिरवत निघाले आहेत आणि तुला तुझ्या दारिद्र्याची लाज वाटते आहे. जीं मूठभर नाणीं तुझ्याजवळ आहेत त्याची खंत वाटते आहे, पण वेड्या, तुझ्याजवळ दुसरीहि संपत्ति भरपूर आहे. जरा आंत डोकावून पाहा तरी !

अरे, हा अनाहत ढोल बाहेर वाजतो आहे. जरा घुंगटका पट खोल तर खरा ! कुणी तरी तुला पुकारणार आहे, 'चलो मच्छिंदर, गोरख आया.' मग तुला जाग येईल. आणि सारं राजवैभव, सुखविलास, या तनमनाची बढाई, सारं सोडून तुला धावावं लागेल त्या हाकेमागं. वेड्या, सागरावरल्या अनंत लाटा तुला पुकारतात तें तुला ऐकूं येत नाही ? त्या अनंत तारका तुला खुणावतात तें तुला दिसत नाहीत ? वृक्षलतांच्या आडून वारा तुला करपल्लवी करतो ती तुला कळत नाही ?

वेडा रे वेडा तूं !

पण तूं शहाणा आहेस, तूं बुद्धिमंत आहेस. वेदविद् आहेस, तत्त्वज्ञ आहेस, ज्ञानेश्वर आहेस. मग ? कदाचित् तूं जगावर रुसला असशील ! तुला या जगांत विचित्र अनुभव आले असतील. म्हणून तूं स्वतःवर व जगावर रागावला असशील व ताटी लावून आंत बसला असशील. ज्ञानराज, असं कसं बरं शोभून दिसेल ? उघडा ना ताटी ज्ञानेश्वरा !

चार भिंतींच्या आंत स्वतःला असं कोंडून घेतलं म्हणजे का आपण निर्भय होऊं ? परीक्षितानं नव्हता का कडेकोट बंदोबस्त केला ? पण जें व्हायचं तें टळलं का ? चोर का बाहेरून येतात ? वाईट विचार का बाहेरून येतात ? अरे, बडा चोर मनांतच लपला आहे तुझ्या !

मग माझं स्वागत कां करीत नाहीस तूं ? तुला एक गंमत सांगतों. अरे, तुझ्या दारावरून मी अनेकदा गेलों आहें. तुझ्या शेजारीं अनेकदा

वावरलों आहें. पण आता हें तुझं दार बंद पाहिलं तेव्हा मला अवसान चढलं आणि ठोठावावंसं वाटलं !

बरं का, बंद दार म्हणजे भित्रेपणा समजतों मी. बंद दार म्हणजे संशयास्पदता. बंद दारापाशीं साहजिकच थबकावंसं वाटतं. फटींतून चोरून पाहावंसं वाटतं. कान तिखट करून ऐकावंसं वाटतं. भित्र्या आणि संशयी माणसांनाच माझा त्रास अधिक होत असेल. ते कशाला तरी एकसारखे भीत असतात. ते संरक्षण शोधीत असतात. ते, मी पाहतों की, स्वतःच्या संरक्षणासाठी आणलेल्या शस्त्रांनीच मरतात. उलट जे साहसाला सामोरे जातात ते अयशस्वी होतातच असा कांही नियम नाही. उलटच होत होतं. अनुभव काय ? जे मरणाला सामोरे जातात ते कधी कधी मरणाला जिंकून अमर होतात !

तुला काय वाटतं ? तुझ्या दारांत कुणी अतिथि आला असेल ? याचक असेल ? भिकारी असेल ? असेलहि. त्याच्यासाठीहि तुझं दार उघडंच हवं. तो मागून मागून काय मागेल ? आपला देश आणि संस्कृति 'अतिथि देवो भव' म्हणणारांचा आहे. अतिथि काय मागेल ? ते देणारांचा आहे ! तो मागून मागून काय मागेल ? धन-दौलत मागेल, की त्रिपाद भूमि ? कवच-कुंडलं मागेल, की तुझीं हाडं ? मागूं दे. देऊन टाक. अरे, मागणारे देव भीक मागत जगले. 'वर मागणारे' राक्षस वर घेऊनहि मेले. आणि देणारे मात्र चिरंजीव झाले. अमर झाले. कुणी देवाला दारांत रक्षक म्हणून बसवलं तर कुणीं देवांचं साम्राज्य टिकवायला सहाय्य केलं. मी तर तुझ्याकडे कांही मागायला आलेलों नाही. तुला नवजीवन द्यायला आलों आहें. मग एवढा भितोस कशाला ?

आणि काय रे, तुझ्या खोलीचीं दारं बंद रे कशाला करून ठेवायला हवींत ? तुझ्याजवळ लपवण्यासारखं कांही आहे काय ? लाजिरवाणं होईल असं कांही तुझ्याजवळ आहे काय ? मी म्हणतों आल्यागेल्यांसाठी तुझं मुक्तद्वार असावं. भूमीची शय्या आणि आकाशाचं छत्र हीं सर्वांसाठी सर्वकाळ परमेश्वरानं दिलीं आहेत, आपण त्यांच्या वांटण्या करायच्या ? छोटे छोटे तुकडे पाडायचे ? कुंपणं घालायचीं ? स्वतःच स्वतःला बंधनांत घालायचं ?

मला तर वाटतं सगळ्या घरांचीं, सगळ्या माणसांच्या मनांचीं दारं मोकळीं असावींत ! मला तर वाटतं प्रत्येक घरांत डोकवावं आणि कुठं छोटीं मुलं गाढ झोपेंत मौजेचीं स्वप्नं पाहत असतील तिथं जावं, त्यांच्या उशापायथ्याशीं खाऊ-खेळण्यांचे ढीग रचावेत व हळूच पाऊल न वाजवतां तेथून यावं. कुणी कुढत असतील, चिडलेले असतील, कुणाच्या मनांत गैरसमजांचीं जाळीं-जळमटं साचलीं असतील, कुठं कांही विकृति, गंड उत्पन्न झाले असतील तर तें सारं नष्ट करावं.

आपल्या डोळ्यांचे दरवाजे बंद करून व्यायचे. आपल्या डोळ्यांनी कांही पाहायचंच नाही; असं वागणारीं माणसं मला आवडत नाहीत. आपल्या मनांतले विचार बोलून दाखवायची ज्यांना भीति वाटते आणि म्हणून जे तोंड मिटून बसतात, तें मला आवडत नाही. मिटलेल्या दाराप्रमाणं मिटलेल्या तोंडाप्रमाणं, कृपणांचे घट्ट मिटलेले हात आणि जेव्हा तेव्हा वज्रमुष्टींची भाषा बोलणारांचे हात—याचाहि मी तिरस्कार करतों.

भल्या गृहस्था, आज अवचित पाहुणा म्हणून आलों आहें मी. मी कदाचित् सुवर्णसंधि घेऊन आलों असेन. तिला तूं संकट मानीत असलास तर तुझ्यासारखा दुर्दैवी तूंच— असं मी म्हणेन. खरं म्हटलं तर, माणसानं संकटालाहि संधि मानायला शिकलं पाहिजे. म्हणून म्हणतों कोणत्याहि परिस्थितींत, कोणत्याहि वेळीं तुला दार उघडायलाच हवं. मग उगाच विलंब कां ?

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

93992
REFBK-0013112